जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# हॉटेलमधील किरकोळ वादातून तिघा तरुणांवर जीवघेणा हल्ला

**चांदबीबी महालाच्या पायथ्याची घटना, ७ ते ८ जणांवर गुन्हा दाखल**

नगर – हॉटेलमधील किरकोळ वादातून एका तरुणासह त्याच्या मित्रांवर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची घटना चांदबीबी महालाच्या पायथ्याजवळ बारदरी (ता.नगर) शिवारात असलेल्या 'हॉटेल जय बजरंग' येथे २८ जून रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ७ ते ८ अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत प्रियज संतोष कर्पे (वय १९, रा. मेहेकरी, ता. नगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा २८ जून रोजी संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास चांदाबीबी महालाच्या पायथ्याशी बारदरी गावाचे शिवारात असलेल्या 'हॉटेल जय बजरंग' येथे गेला होता. त्यावेळी हॉटेलमधील बाकड्यावर बसल्याच्या कारणावरून तेथे वाद झाला. या किरकोळ कारणाचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मित्रांवर हल्ला केला.

या हल्ल्यात मेटलचे बटन असलेल्या स्टिक रॉडने फिर्यादी प्रियज कर्पे, सार्थक रवींद्र डहाणे आणि प्रज्वल रणजीत पालवे यांच्या डोक्यावर व पाठीवर मारून गंभीर दुखापत करण्यात आली. एवढेच नव्हे तर, इसको पिस्तुल से ठोक दो अशी जीवे मारण्याची धमकीही आरोपींनी दिली. या घटनेनंतर २९ जून रोजी दुपारी प्रियज कर्पे याच्या फिर्यादी वरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अनोळखी ७ ते ८ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एचएसआरपी क्रमांक फलक नसलेल्या वाहनांवर १ जुलैपासून कारवाई

नगर – उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक नसलेल्या वाहनांवर १ जुलै २०२६ पासून विशेष तपासणी मोहीम राबवून मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. ३० जून पर्यंत एचएसआरपी बसविण्याची मुदत निश्चित करण्यात आली असून, यापूर्वी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून वेळ निश्चित केलेल्या वाहनांना त्या दिनांकापर्यंत कारवाईतून सूट राहणार आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी यांनी दिली.

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार व केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० अन्वये १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व मोटार वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत ३० जून निश्चित करण्यात आली आहे.

१ जुलै पासून एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ व केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० तसेच कलम १७७ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

ज्या वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून वेळ निश्चित केली आहे, अशा वाहनांना त्या दिनांकापर्यंत कारवाईतून सूट देण्यात येणार आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर कार्यक्षेत्रातील सर्व वाहनधारकांनी अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करून त्वरित एचएसआरपी क्रमांक फलक बसवून घ्यावेत. १ जुलै पासून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी एचएसआरपी क्रमांक फलक बसवून शासनाच्या निर्देशांचे पालन करावे, असे आवाहनही श्री.जोशी यांनी केले आहे.

# वीजेचा शॉक बसून दोन म्हशींचा मृत्यू

**निष्काळजीपणा केल्याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल**

नगर – भिंगार जवळील बाराबाभळी शिवारात एका शेतात विजेचा तीव्र धक्का लागून दोन दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २९ जून रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे दूध व्यावसायिक शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यामध्ये दोघा जणांविरुद्ध निष्काळजीपणा केल्या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत निलेश सतीश आहेरगवळी (वय ४०, रा. बाराबाभळी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे दूध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. २९ जून रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास त्यांच्या म्हशी बाराबाभळी शिवारातील म्हशानखाणीच्या परिसरात नेहमीप्रमाणे चरत होत्या. याच परिसरात सार्वजनिक हायमॅक्स विजेचा खांब आहे.

या गावातील रहिवासी आरोपी अशोक कराळे आणि आबा कराळे या दोघांनी मिळून सार्वजनिक विजेच्या खांबावरून अनधिकृतपणे विजेचा आकडा टाकला होता. या टाकलेल्या वायरमधील वीज प्रवाह संपूर्ण परिसरात आणि जमिनीत उतरला होता. म्हशी चरत असताना या धोकादायक वीज प्रवाहाचा त्यांना जोरदार झटका बसला. या धक्क्याने एक जाफराबादी आणि एक म्हशान जातीची म्हैस जागीच दगावली.

याबाबत निलेश आहेरगवळी यांच्या तक्रारीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी अशोक कराळे आणि आबा कराळे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अकोलकर या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# खुन करून पळालेला आरोपी एमआयडीसीजवळ पकडला

**पैशांच्या देवाणघेवाणीतून केला होता खून, साईबन परिसरात ठोकल्या बेड्या**

नगर – श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव येथील वडारवाडा भागात पैशांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या वादातून एका तरुणाचा खून करणाऱ्या आरोपीला नगर एमआयडीसी पोलिसांनी साईबन परिसरात अत्यंत शिताफीने अटक केली आहे. विशाल प्रदीप तोरणे (वय ४०, रा. तोरणेवाडी, पढेगाव, ता. श्रीरामपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.


श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव येथे खुन करून पळालेला आरोपी नगर जवळ पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शशिकांत जगन्नाथ बनकर (रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर) यांनी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात २९ जून रोजी पहाटे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार, २७ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास वडारवाडा परिसरात पैशांच्या देवाणघेवाणीच्या कारणावरून आरोपी विशाल तोरणे याने फिर्यादीचा पुतण्या सचिन सुभाष बनकर (वय ४०, रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर) याच्याशी वाद घातला. या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. आरोपीने सचिन याच्या पोटात, पाठीत आणि तोंडावर लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण केली. या मारहाणीमुळे सचिनच्या पोटात मोठ्या प्रमाणात अंतर्गत रक्तस्राव झाला, ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०३(१), ११५(२), आणि ११७ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. दरम्यान, हा आरोपी नगर एमआयडीसी परिसरातील साईबन भागात आल्याची गोपनीय माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या तपास पथकाला सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने साईबन परिसरात सापळा रचून आरोपी विशाल तोरणे याला शिताफीने ताब्यात घेतले. एमआयडीसी पोलिसांनी आरोपीला पकडून पुढील तपासासाठी श्रीरामपूर तालुका पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही कारवाई सपोनि हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, पो.कॉ. दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली आहे.

# सूज्ञ नागरिकाकडून समयसूचकतेने 'डायल ११२' चा वापर

नगर – एका सुज्ञ नागरिकाने समयसूचकता दाखवत डायल ११२ चा प्रभावी वापर करून पोलिसांना वेळेत माहिती कळविल्याने घातपात करण्यासाठी तलवार घेवून फिरणाऱ्याला पोलिसांनी पकडले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे. बोल्हेगावच्या रेणुकानगर परिसरात ही घटना घडली. शैलेश इन्नाती पाळंदे (वय ४५, रा.रेणुकानगर, बोल्हेगांव) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

तोफखाना पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार गोरक धाकतोडे हे डायल ११२ वर कार्यरत असताना त्यांना डायल ११२ यावर कॉल आला की, रेणुकानगर, बोल्हेगांव येथे एक इसम जुन्या भांडण्याच्या कारणातुन घातपात करण्याच्या उद्देशाने तलवार घेवुन परिसरात फिरत आहे. ही गंभीर बाब असल्याने पो.कॉ.धाकतोडे यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांना कळविले. त्यांनी गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना त्यांच्या गुन्हे शोध पथकासह पो.कॉ. धाकतोडे यांच्या मदतीसाठी रेणुकानगर, बोल्हेगांव येथे पाठविले. या पथकाने परिसरात शोध घेवून शैलेश पाळंदे याला शिताफीने पकडले. त्याच्या कडे ३५ इंच लांबीची टोकदार तलवार मिळुन आली आहे. सदर बाबत तोफखाना पोलीस ठाण्यात आर्म क्ट कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर व पोलीस अंमलदार तसेच डायल १२२ साठी नेमलेले पोलीस कर्मचारी गोरक धाकतोडे यांनी केली आहे.

# नगर – पुणे महामार्गावर केडगाव येथे भीषण अपघात

**भरधाव ढंपरच्या धडकेत दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू**

नगर – नगर पुणे महामार्गावर केडगाव बायपास चौकाजवळ असलेल्या नील हॉटेलसमोरील स्पीड ब्रेकरवर एका भरधाव ढंपरने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या भीषण अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या कांचन उर्फ अरमीना अरबाज चौगुले (रा. बालाजी कॉलनी, शाहूनगर, केडगाव) या महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात ढंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अरबाज समीउल्ला चौगुले (वय २६, रा. बालाजी कॉलनी, शाहूनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २९ जून रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पत्नी कांचन उर्फ अरमीना यांच्यासह आपल्या मोटारसायकल (क्र.एमएच १६ डीएल ३२११) वरून नगर पुणे महामार्गाने जात होते. नील हॉटेलसमोरील स्पीड ब्रेकर आल्यामुळे त्यांनी आपल्या वाहनाचा वेग कमी केला. याच वेळी त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या अशोक लेलँड कंपनीच्या ढंपर (क्र.एमएच १७ सीव्ही २४०२) वरील चालकाने आपल्या ताब्यातील ढंपर अत्यंत बेदरकारपणे चालवून चौगुले यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. या भीषण धडकेत कांचन उर्फ अरमीना गंभीर जखमी झाल्या व त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

या अपघातानंतर रात्री अरबाज चौगुले यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी ढंपर चालक शिवाजी लक्ष्मण कोठे (रा. कोल्हार, ता. राहाता) याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब) आणि १७७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


कोयता व तलवार बाळगत दहशत करणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# कोयता व तलवारने दहशत करणाऱ्याला पकडले

नगर – केडगाव परिसरात धारदार लोखंडी कोयता आणि तलवार जवळ बाळगत दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाच्या कोतवाली पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून त्याच्या कडून कोयता व तलवार जप्त करण्यात आली आहे. सोमनाथ राजेंद्र गंगतीरे (वय २७, रा. समतानगर, देवी मंदीरामागे, केडगाव) असे आरोपीचे नाव आहे.

कोतवाली पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे अमंलदार वट सावित्री पोर्णिमेच्या अनुशंगाने २९ जून रोजी दुपारी १ च्या सुमारास केडगाव परिसरात पेट्रोलिंग करत असतांना त्यांना पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी फोनव्दारे कळविले की केडगाव देवी मंदिरामागे समतानगर येथे एक इसम हा हातात तलवार घेवुन परिसरात दहशत करीत आहे. तुम्ही तेथे जावुन कारवाई करा असे फोन व्दारे आदेशीत केले. त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाचे अमंलदार यांना सदर माहिती कळवुन लगेच केडगाव देवी मंदीरामागे समतानगर पाठविले. पथकाने तेथे सोमनाथ गंगतीरे याला शिताफीने पकडले. त्याचे राहते घराची बाहेरील परिसराची झडती घेतली असता एक तलवार व लोखंडी कोयता मिळुन आला. पथकाने तो जप्त करत सोमनाथ याला ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई पो.नि. नितीन देशमुख यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हेशोध पथकातील उपनिरीक्षक गणेश देशमुख, पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, रोहिणी दरंदले, राहुल शिंदे, बाळकृष्ण दौंड, विनोद बोरगे, साबीर शेख, विशाल दळवी, दिपक रोहकले, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरदे, रमेश शिंदे, अतुल काजळे, अमोल गाडे, सुरज कदम, सत्यम शिंदे, अतुल लाटे, सचिन लोळगे, संकेत धिवर, महेश पवार, पल्लवी रोहकले, राहुल गुंडू यांचे पथकाने केली आहे.

# अहमदनगर मर्चंटस बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा



नगर – अहमदनगर मर्चंटस को–ऑप. बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीसाठी बँकेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांची सभा ३० जून रोजी सहकारी संस्था सहायक निबंधक गणेश ओटी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. चेअरमन पदासाठी संजय चोपडा यांचे नाव संचालक मोहन बरमेचा यांनी सुचविले व त्यास संचालक अनिल पोखरणा यांनी अनुमोदन दिले.

या निवडीप्रसंगी मावळते चेअरमन हस्तीमल मुनोत, विद्यमान व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक, जॉईंट सी.ई.ओ. नितिन भंडारी आदि उपस्थित होते.

संजय चोपडा हे अहिल्यानगर शहरातील उद्योजक असून अ.नगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आहेत. तसेच यापूर्वीही त्यांनी बँकेच्या चेअरमन पदाचा कार्यभार सांभाळलेला होता.

या प्रसंगी सभाध्यक्ष गणेश ओटी यांनी बँकेचे नूतन चेअरमन चोपडा यांचा सत्कार करून त्यांना त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व बँकेची उत्तरोत्तर भरभराट होण्यासाठी त्यांनी बँकेस शुभेच्छा दिल्या. तसेच बँकेचे संस्थापक हस्तीमल मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाची कार्य करण्याची पद्धत चांगली आहे, असे म्हटले.


यावेळी अमित मुथा, अनिल पोखरणा, संजीव गांधी, मीनाताई मुनोत, संजय बोरा, विजय कोथिंबीरे यांची शुभेच्छापर समयोचित भाषणे झाली.

बँकेचे नूतन चेअरमन संजय चोपडा यांनी सांगितले की, हस्तीमल मुनोत यांनी बँकेला ज्या प्रगतीपथावर नेले आहे तसेच बँकेचा नावलौकिक केलेला आहे. त्या नावलौकिकास मी कुठलाही तडा न जाऊ देता बँकेच्या नावलौकिकात अधिकाधिक भर घालीन. सदरचे पद हे काटेरी खुर्चीप्रमाणे आहे. सर्व संचालकांना सोबत घेऊन बँकेची प्रगती करील. हस्तीमल मुनोत यांचे जे स्वप्न आहे, की सभासदांना रक्कम रुपये ५,१०० ची मुदत ठेव पावती देण्याचा, यासाठी मी पाठपुरावा करून प्रस्ताव मंजूर करीत हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते ठेव पावतीचे वितरण करण्यात येईल.

हस्तीमल मुनोत यांनी भाषणात मी बँकेच्या ज्या प्रगतीचे स्वप्न पाहिलेले आहे त्याच प्रकारे बँकेची प्रगती होत असून संजय चोपडा हे चेअरमन पदाची कामगिरी अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडतील असा विश्वास व्यक्त करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

निवडणूक अधिकारी गणेश ओटी यांचा बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

# सृष्टीपाल धुस्सा यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील रिमांड होम समोरील, पूर्वीचे श्रीराम सॉ – मिलचे मालक सृष्टीपाल जगन्नाथ धुस्सा (वय ८५) यांचे २९ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बडोदा बँक समोरील श्री साईचरण शु पॅलेसचे मालक राजेश व अनुप धुस्सा यांचे वडील, संजय, नरेंद्र, अनिल, निलेश, राकेश व शंकर धुस्सा यांचे चुलते, चि.यश व हर्षित धुस्सा यांचे आजोबा होत.

# तुषार (मुन्ना) बोरसे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील तुषार (मुन्ना) बाळासाहेब बोरसे (वय ४८) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, चुलत बंधू, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. विनोद बोरसे यांचे थोरले बंधू, पत्रकार राजेंद बोरसे यांचे चुलत बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी सहकार्य करावे

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन; ३ हजार ८३० बीएलओ ३० जूनपासून घरभेटी घेणार**

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातही विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमास प्रारंभ झाला असून, या मोहिमेद्वारे प्रत्येक पात्र मतदाराची नोंद अचूक व अद्ययावत करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलले. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुनील गाढे, तहसीलदार श्रीमती श्वेता संचेती आदी उपस्थित होते.


मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया. समवेत उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुनील गाढे, तहसीलदार श्रीमती श्वेता संचेती आदी.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, १ ऑक्टोबर २०२६ हा या पुनरीक्षणासाठी पात्रता दिनांक म्हणून निश्चित करण्यात आला आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील ३ हजार ८३० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन त्यांना गणना प्रपत्राचे वितरण करतील. या प्रपत्रात मतदारांची वैयक्तिक माहिती व आवश्यक कागदपत्रांची नोंद घेण्यात येणार असून, त्या आधारे प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. ते पुढे म्हणाले की, २९ जुलै २०२६ पर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींचा निपटारा ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत करण्यात येणार असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३ हजार ८३० मतदान केंद्रे असून, या कामासाठी १२ निर्वाचक नोंदणी अधिकारी, ३६९ सहायक निर्वाचक नोंदणी अधिकारी, ३ हजार ८३० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि ६ हजार ९७१ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे.

जिल्ह्यातील ३८ लाख १० हजार १०२ मतदारांपैकी ३२ लाख ५० हजार ६९३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून, म्हणजेच ८५.३२ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. अकोले विधानसभा मतदारसंघात ९२.८४ टक्के, संगमनेरमध्ये ९२.३७ टक्के, शिर्डीमध्ये ८२.८८ टक्के, कोपरगावमध्ये ८५.०९ टक्के, श्रीरामपूरमध्ये ८७.९५ टक्के, नेवासामध्ये ८५.६५ टक्के, शेवगावमध्ये ८५.९२ टक्के, राहुरीमध्ये ८३.१६ टक्के, पारनेरमध्ये ८६.६६ टक्के, अहिल्यानगर शहरात ७१.१९ टक्के, श्रीगोंदामध्ये ८४.६८ टक्के आणि कर्जत–जामखेडमध्ये ८६.७४ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित मतदारांचे मॅपिंगही विहित कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे.

घरभेटीदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. तसेच सर्व राजकीय पक्ष, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी आणि नागरिकांनी भारत निवडणूक आयोगाच्या या महत्त्वपूर्ण मोहिमेत सहकार्य करून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हे आहे 'गोल्डन सुपरफूड'

हळद ही भारतीय स्वयंपाकघरातील पिवळं सोनं आहे. प्राचीन काळापासून पूजेत, औषधात आणि जेवणात हळदीला मानाचं स्थान आहे. आता आधुनिक विज्ञानानेही हळदीला 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. हळदीतील खास 'कर्क्युमिन' नावाचं तत्व एक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट आणि दाहशामक आहे. ते शरीरातील सूज कमी करतं, सांधेदुखीवर गुणकारी आहे आणि जखमा लवकर भरून येण्यास मदत करतं. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हळदीचं दूध रामबाण उपाय मानला जातो. नियमित हळद खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते, यकृत स्वच्छ राहतं आणि रक्त शुद्ध होतं. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठीही हळद उपयुक्त, कारण ती चयापचय क्रिया वाढवते. कर्क्युमिनमुळे मेंदूचे कार्य सुधारते आणि अल्झायमरसारख्या आजारांपासून बचाव होतो. त्वचा उजळ करण्यासाठी, मुरुमं कमी करण्यासाठी हळदीचा लेप प्राचीन काळापासून वापरला जातो. आयुर्वेदात हळदीला कफ-वातशामक, जंतुनाशक आणि रक्तशुद्ध करणारं औषध मानलं आहे. चहा, दूध, भाजी, आमटी अशा अनेक प्रकारे हळद आपल्या आहारात सहज येते. महागड्या विदेशी सप्लिमेंट्सपेक्षा हळद स्वस्त, सहज आणि आपल्या परंपरेतली असल्याने अधिक गुणकारी ठरते.

## पाककला

### ओट्स उपमा

**साहित्य** : ओट्स १ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ लहान, उकडलेला मटार २ चमचे, बारीक चिरलेली गाजर २ चमचे, शिमला मिरची २ चमचे, हिरवी मिरची १, कढीपत्ता ८-१० पाने, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हळद १/४ चमचा, हिंग चिमूटभर, तेल १ चमचा, मीठ चवीनुसार, कोथिंबीर १ चमचा, लिंबू अर्धा.

**कृती** : ओट्स कोरडे २ मिनिटं भाजून घ्या. कढईत तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता, हिरवी मिरची फोडणी द्या. त्यात कांदा गुलाबी होईपर्यंत परता. नंतर गाजर, शिमला मिरची, मटार घालून २ मिनिटं परता. हळद, मीठ घालून भाजलेले ओट्स टाका. सर्व एकजीव करून त्यात १.५ वाटी गरम पाणी घाला. झाकण ठेवून ३-४ मिनिटं मंद आचेवर शिजू द्या. गॅस बंद करून वरून कोथिंबीर आणि लिंबू पिळून गरम गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### घरात समृद्धीसाठी

* दरवाजाच्या उंबरठ्यावर लक्ष्मीची पावले काढावीत.
* तुटलेला, चिरलेला दरवाजा त्वरित बदलावा.
* दरवाजावर तोरण, आंब्याची पाने बांधल्याने शुभ ऊर्जा वाढते.
* मुख्य दरवाजातून घरात शिरताना डावीकडे स्वयंपाकघर नसावे.
* दरवाजाचा रंग गडद काळा किंवा लाल नसावा. हलका रंग शुभ.
* दरवाजा नेहमी स्वच्छ ठेवा. सकाळी पाणी घालून पुसल्यास लक्ष्मी प्रसन्न होते.

## सौंदर्य

* आवळा, शिकेकाई, रिठा पावडरने केस धुतल्यास नैसर्गिक काळेपणा टिकतो.
* हेअर ड्रायर, स्ट्रेटनरचा वापर कमी करा. उष्णतेने केस खराब होतात.
* रोज २ बदाम, १ अक्रोड खा. केस दाट होतात.
* मेंदी लावताना त्यात कॉफी, चहापाणी मिसळा. रंग छान येतो.

## सल्ला

* पनीर मऊ करण्यासाठी क्यूब पाण्यात १० मिनिटं भिजवा. * तुपाला बुरशी येऊ नये म्हणून त्यात २-३ लवंगा टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, पू.षा. ०६।५२, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : शिक्षणात यश, स्पर्धा परीक्षेत बाजी माराल. मित्रांकडून अचानक मदत मिळेल.

**वृषभ** : शुभकार्याची चर्चा रंगेल. जुन्या गुंतवणुकीतून नफा मिळेल. जमिनीचे व्यवहार जुळतील. कुटुंबासोबत वेळ मजेत जाईल.

**मिथुन** : लेखन-कलेत प्रसिद्धी मिळेल. अचानक धनलाभ होईल. प्रवासातून फायदा होईल. मीडिया क्षेत्रात संधी चालून येईल. शेअर बाजारात नफा.

**कर्क** : वाहन खरेदीचे योग आहेत. तब्येत उत्तम, मन प्रसन्न राहील. आईकडून लाभ होईल. घर बदलण्याची शक्यता.

**सिंह** : सरकारी कामात यश मिळेल. वरिष्ठांकडून कौतुक होईल. मान-प्रतिष्ठा वाढेल. राजकीय क्षेत्रात नाव होईल.

**कन्या** : धार्मिक प्रवास घडेल. पाहुण्यांचे आगमन होईल. नोकरीत स्थिरता लाभेल. हिशोबात यश मिळेल.

**तूळ** : जोडीदाराकडून भेट मिळेल. भागीदारीत नफा वाढेल. विवाहाचे योग जुळतील.

**वृश्चिक** : कोर्टात विजय मिळवाल. शत्रूवर मात कराल. संशोधनात यश मिळेल. अचानक धनलाभ होईल.

**धनु** : मुलांच्या प्रगतीमुळे आनंद होईल. क्रीडेत चमकण्याची संधी. उच्च शिक्षणात यश मिळेल.

**मकर** : घर सजावटीवर खर्च होईल. नातेवाईक भेटतील. नोकरीत स्थैर्य लाभेल. राजकीय ओळखी होतील.

**कुंभ** : नवीन तंत्रज्ञान शिकाल. भावंडांचे सहकार्य मिळेल. संशोधनात यश मिळेल. मित्र परिवार वाढेल.

**मीन** : गोड बोलून कामे होतील. कला-संगीतात प्रगती होईल. परदेशाशी संबंधित यश मिळेल. अध्यात्मात मन रमेल. दानधर्मात समाधान मिळेल.

## शब्दगंध क्र. ७४६३ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | ९ | | | |
| | ■ | १० | | | | ■ | |
| ११ | १२ | | ■ | ■ | ■ | १३ | |
| ■ | | ■ | १४ | | १५ | | ■ |
| १६ | | १७ | | ■ | १८ | | १९ |
| २० | | | | २१ | ■ | ■ | |
| २२ | | ■ | ■ | २३ | | | |

**आडवे शब्द :-** १) फलंदाज असलेला भारताचा प्रसिद्ध निवृत्त क्रिकेटपटू ८) ठराव; निश्चय; ॲग्रिमेंट ९) बडबड; कोमलता; चुरुचुरू १०) स्वामिनी; मालकाची बायको ११) अंथरण्याचे एक जाडसर वस्त्र १३) बेकरीत तयार होणारा एक खाद्यपदार्थ १४) लगोलग; मागोमाग १६) वजन असलेला; प्रतिष्ठित १८) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार २०) विष्णू २२) क्रोध; त्वेष २३) अंगावर रोमांच येऊन; कंप (शरीराचा वगैरे)

**उभे शब्द :-** १) नाजूक; सुकुमार; कोमल २) घडीव दगड; पागोटे ३) मऊपणा; मवाळकी; मृदुता ४) बसल्या बसल्या येणारा झोपेचा झटका ५) क्षार; रामरस; मीठ ६) ओढा; झोक; रोख ७) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ १२) चिनी मातीच्या पेल्यात पाणी घालून त्यातून सप्तस्वर काढणारे यंत्र १३) अध्यापक; पुराणिक १४) शिकार; मृगया १५) अलगूज; बासरी; मुरली १६) इकडे तिकडे पसरलेल्या वस्तू १७) हिंदी किंवा उर्दूत डाग किंवा धब्बा; राजेश खन्नाचा एक हिंदी चित्रपट १९) लढाई; रण; संगर २१) घोडे जोडलेले देवादिकांचे वाहन

### शब्दगंध क्र. ७४६२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | नो | रं | ज | न | ■ | स | वा |
| स | क | ■ | ब | ल | व | त | र |
| न | र | व | र | ■ | न | र | क |
| द | ■ | र | द | न | ■ | ■ | री |
| ■ | शि | क | स्त | ■ | धि | ■ | ■ |
| क | वा | ड | ■ | अ | क | ब | र |
| मा | ल | ■ | ग | ग | न | च | र |
| न | य | न | र | म्य | ■ | त | ■ |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : तुमची सुरुवात कशी झाली यापेक्षा शेवट कसा झाला ते महत्त्वाचं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बर्फ पांढरा असूनही पाणी पारदर्शक का असतं?

आपण रोज पाणी पितो. ते स्वच्छ, पारदर्शक दिसतं. पण तेच पाणी थंड करून बर्फ बनवलं की पांढरं का दिसतं? हा प्रश्न अनेक मुलांना पडतो. याचं उत्तर विज्ञानात दडलंय.सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे प्रकाशाची वागणूक. पाणी द्रव स्वरूपात असतं तेव्हा त्याचे रेणू एकमेकांपासून थोडे दूर आणि मोकळे असतात. त्यामुळे प्रकाशाचा किरण पाण्यातून सरळ आरपार निघून जातो. प्रकाशाला अडथळा येत नाही म्हणून पाणी पारदर्शक दिसतं. ग्लासात पाणी ओतलं तरी आपल्याला ग्लासच्या पलीकडचं दिसतं, याचं कारण हेच. पण पाणी जेव्हा बर्फात रूपांतरित होतं, तेव्हा त्याचे रेणू एका ठराविक आकारात जमतात. त्यांना आपण 'क्रिस्टल स्ट्रक्चर' म्हणतो.

बर्फ तयार होताना त्यात खूप छोटे-छोटे हवेचे बुडबुडे आणि बर्फाच्या स्फटिकांमधील पोकळ्या अडकतात. आता प्रकाशाचा किरण जेव्हा या बर्फावर पडतो, तेव्हा तो सरळ आरपार जात नाही. बर्फाच्या आतल्या प्रत्येक स्फटिकावर आणि हवेच्या बुडबुड्यावर प्रकाश आपटतो आणि वेगवेगळ्या दिशेला परावर्तित होतो. याला 'स्कॅटरिंग' म्हणतात. सूर्यप्रकाशातील सातही रंग एकत्र येऊन आपल्याला पांढरा रंग दिसतो. त्यामुळे बर्फातून सर्व रंग एकत्रितपणे आपल्या डोळ्यांपर्यंत येतात आणि बर्फ पांढरा दिसतो.याच कारणामुळे ढग पांढरे दिसतात. ढगात पाण्याचे सूक्ष्म थेंब असतात. ते पण प्रकाशाचं स्कॅटरिंग करतात. नवीन पडलेला बर्फ जास्त पांढरा आणि चमकदार दिसतो, कारण त्यात हवेचे बुडबुडे जास्त असतात. जुना, दाबला गेलेला बर्फ थोडा निळसर दिसतो.

कारण दाबामुळे हवेचे बुडबुडे कमी होतात आणि प्रकाश जास्त अंतर प्रवास करतो. तेव्हा लाल रंग शोषला जातो आणि निळा रंग परावर्तित होतो. थोडक्यात, पाणी पारदर्शक असण्याचं कारण त्यातून प्रकाश सरळ जाणं हे आहे. तर बर्फ पांढरा दिसण्याचं कारण म्हणजे त्यातील असंख्य लहान स्फटिक आणि हवेचे बुडबुडे प्रकाशाला सर्व दिशांना पसरवतात. टीप: जर तुम्ही बर्फाचा मोठा, स्वच्छ तुकडा घेतला ज्यात हवेचे बुडबुडे अजिबात नसतील, तर तो बर्फ पण पाण्यासारखा पारदर्शक दिसेल. सरोवरावर तयार होणारा बर्फ किंवा हिमनदीचा बर्फ याचं उत्तम उदाहरण आहे. हिमनद्यांमध्ये बर्फ शेकडो वर्षे दाबला जातो, त्यामुळे तो निळा दिसतो.

## छोटीशी धडपड

छोटीशी धडपड एका हिरव्यागार जंगलात सर्व प्राणी गुण्यागोविंदाने राहत होते. मोठमोठे हत्ती, चपळ हरणे, राजासारखा वावरणारा वाघ आणि उंच झाडांवर माकडांची टोळी. त्याच जंगलात एका जुन्या पिंपळाच्या ढोलीत छोटीशी मधमाशी राहत होती. नाव तिचं 'चिमू'. सगळे प्राणी तिला हसायचे. अगं तू इतकी छोटी, तुझा काय उपयोग? असं म्हणून हत्ती तिला सोंडेने बाजूला करायचा. चिमूला वाईट वाटायचं, पण ती काही बोलायची नाही. रोज सकाळी उठून फुलाफुलांवर जायची, मध गोळा करायची आणि आपल्या पोळ्यात साठवायची. माझं काम लहान असेल, पण मी ते प्रामाणिकपणे करते, असं ती स्वतःशीच म्हणायची.

एक दिवस जंगलाच्या सीमेवर काही माणसं आली. त्यांच्या हातात कुऱ्हाडी आणि करवती होत्या. या जंगलातली झाडं तोडून आपण कारखाना काढू, म्होरक्या म्हणाला. दुसऱ्या दिवसापासून 'कर्र-कर्र' आवाज सुरू झाला. एका मागोमाग एक झाडं धाडकन खाली कोसळू लागली. प्राणी घाबरले. हत्ती चिंतेत सोंड हलवू लागला, वाघ गुरगुरत झाडामागे लपला. आता आपलं घर जाणार, हरणं रडू लागली. सगळ्यांनी सभा बोलावली. आपण हल्ला करू, वाघ म्हणाला. पण माणसांच्या बंदुका पाहून त्याची हिंमत झाली नाही. आपण पळून जाऊ,

माकडं म्हणाली. पण जाणार कुठे? सगळ्यांचं घर तेच जंगल होतं. कोणीच काही करू शकत नव्हतं. सगळे हताश झाले. तेवढ्यात छोटी चिमू पुढे आली. मी प्रयत्न करू का? ती हळूच म्हणाली. हत्ती हसला, तू? तुझा आवाज तरी कोण ऐकेल? पण चिमूकडे दुसरा पर्याय नव्हता. ती उडाली. तिने तिच्या सर्व मैत्रिणींना बोलावलं. शेकडो, हजारो मधमाश्या जमा झाल्या. एक मोठं थवं तयार झालं. दुसऱ्या दिवशी माणसं पुन्हा झाडं तोडायला आली. जसा पहिला घाव कुऱ्हाडीचा पडला, तसा मधमाश्यांचा थवा 'गुं...गुं...गुं' करत त्यांच्यावर तुटून पडला. माणसांच्या नाकावर, कानावर, डोळ्यांवर माश्या चावू लागल्या. वाचवा, वाचवा! करत सगळे माणसं कुऱ्हाडी टाकून जीव मुठीत धरून पळून गेले. त्यांनी मागे वळूनही पाहिलं नाही.

संध्याकाळी सगळे प्राणी चिमूकडे गेले. हत्तीने सोंड खाली वाकवून तिला नमस्कार केला. आज तू आमचं जंगल वाचवलंस. आम्ही तुला हसलो, पण खरी ताकद तुझ्यातच होती, वाघ म्हणाला. चिमू फक्त हसली आणि म्हणाली, एकटी मी काहीच करू शकले नसते. आपण सगळे एकत्र आलो म्हणून हे शक्य झालं.तेव्हापासून जंगलात कोणीही कोणाला 'छोटा' म्हणून हसायचं नाही. कारण सगळ्यांना कळलं होतं की काम कोणतंही लहान नसतं.

तात्पर्य : संकटाच्या वेळी आकार महत्त्वाचा नसतो, तर धैर्य आणि एकजूट महत्त्वाची असते. लहानात लहान व्यक्तीही मोठा बदल घडवू शकते.



## आत्मशक्ति

### जन्मातून मुक्ती

मुस्लीम धर्मानुसार जाणारा आत्मा न्याय निवाड्याच्या प्रक्रियेतून जातो. त्यानंतर तो स्वर्ग, नरक, अथवा एहराफ जेथे ना दुःख ना सुख मध्ये जातो.जैन धर्मात सुध्दा स्वर्ग, नरक आणि अध्यात्मिक मंडळाचे वर्णन आलेले आहे. त्यातून तो आपला प्रवास करीत असतो.

भारताच्या संत कबीर साहेब यांनी सर्व अध्यात्मिक मंडळांचे (ज्या मंडळांतून मृत्युनंतर आत्मा प्रवास करीत असतो) सविस्तर वर्णन केले आहे. खालच्या ३ मंडळात पिंड, अंड आणि ब्रह्मांड ही मंडळे येतात, ही सर्व मंडळे जड आणि चेतनाम तत्त्वांच्या मिश्रणांनी बनली आहेत. प्रलय झाल्यावर त्यांचा नाश होतो. वरिष्ठ मंडळे आध्यात्मिक मंडळे आहेत. ती अमर आहेत. ह्या मंडळात पारब्रह्म आणि सचखंड या मंडळाचा समावेश होतो. सचखंड पूर्णतः शुध्द आध्यात्मिक मंडळ आहे. तेथूनच परमेश्वराने विस्तारांत जाऊन संपूर्ण सृष्टीची निर्मिती केली. आत्मा अनेक योनीतून जात असतो. अगदी मुक्त होईपर्यंत त्यांची जीवन चक्रातून मुक्ती होत नाही. जेव्हा कनिष्ठ मंडळांतून आत्मा वर येतो, तेव्हा कर्मविधानापासून त्याची सुटका होते. तेथे कर्मविधानानुसार काया, वाचा आणि मनाने केलेल्या कार्य बंधनानुसार त्याला शिक्षा किंवा बक्षीस मिळते. म्हणजेच आत्मा जर कनिष्ठ मंडळे पार करून वर आला, तर आत्मा शुध्द मंडळात प्रवेश करतो. तेथे परमेश्वराशी लीन होऊन दिव्य प्रेम आणि आनंदात राहतो.

गुरु नानक आणि इतर शीख धर्मगुरुसुध्दा आत्म्याच्या मृत्युनंतरच्या प्रवासावर विश्वास ठेवतात. त्यांनी कर्मांच्या हिशोबाच्या नोंदवहीचे वर्णन केले आहे. गुरु ग्रंथ साहेबांत म्हटले आहे,

लेखा रबु मंगेसीआ बैठा कढि वही ।। तलबा पउसनि आकीआ बाकी जिना रही ।। आजराईल फरेसता होसी आई तई ।। आवण जाणु न सुझई भीडी गली फही ।। कूड निखुटे नानका ओड़कि सचि रही ।। (रामकलीकी वार म. १ पृ. ९५३) (या आयुष्याच्या समाप्तीनंतर परमेश्वर तुमच्या कमचा आढावा घेईल, त्याच्या वहीतील नोंदीवरून न्याय करील. पातक्यांना, दोषी लोकांना बोलाविले जाईल.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### स्वयंचलित स्थिती

पण जेव्हा आपण त्या परिस्थितीच्या मध्यात असतो त्या वेळी आपली प्रतिक्रिया खूप महत्त्वाची ठरते. एकदा का तो क्षण निघून गेला की आपली समज फारशी महत्त्वाची ठरत नाही.

या अनुभवानंतर तुम्ही हे शिकला असाल की, ही पद्धत खूप प्रभावी आहे. जेव्हा आपण आपल्या मूळ गुणांचा उपयोग करतो, तेव्हा लोक आपली नक्कल करतात या बाबत आता तुम्हाला खात्री पटली आहे. सुरुवातीला यासाठी धडपड करावी लागते. तुम्ही अस्वस्थ झालात. तुमच्या अहंकाराने तुम्हाला त्रास दिला. त्यानंतर तुम्ही त्या व्यक्तीप्रति तुमचे विचार आणि तरंग बदलले आणि त्यांच्याशी बोललात. हा बदल आतून बाहेर प्रकटला. तुम्ही याच कृतीची पुनरावृत्ती करत राहिलात तर हा तुमचा संस्कार बनेल आणि तुम्हाला यावर पुढे काम करायची गरज पडणार नाही.

सुरेश ओबेरॉय :

ते आपोआपच होत जाईल.

शिवानीदीदी :

एकदा संस्कार तयार झाला की तो स्वयंचलित स्थितीत जातो. जसं आपण रडतो, दुखावले जातो किंवा आपल्याला कळायच्या आधी चिडतो तसंच इतरांना द्यायचं हा संस्कारही सहज होईल.

आज आपल्यापैकी अनेकांना आतून निरर्थक, भावशून्य वाटतं कारण आपण देण्याच्या स्थितीतून घेण्याच्या स्थितीत गेलो आहोत. आपल्या लहानपणापासून आपल्यावर, जे उपयुक्त आहे केवळ तेच वाचेल, हा समज रुजवला गेला आहे. या समजाप्रमाणे, जो सतत काही ना काही मिळवत राहतो तोच टिकून राहू शकतो. त्यामुळे टिकून राहणं, जगणं हेच आपलं ध्येय बनलं. आता टिकून राहण्यासाठी काय करावं लागेल? आपल्याला अधिकाधिक गोष्टी मिळवाव्या लागतील.

आपल्याला कोणी द्यायला शिकवत नाही. सगळ्यांनीच आपल्याला मानसिक आणि भावनिकदृष्ट्या फक्त घेत राहायला शिकवलं. पण घेणं हा आपला मूळ स्वभाव नाही. आपल्याला या जगात फक्त जगायचं नाहीये, तर आपल्याला निसर्गासारखं सतत देत राहायचं आहे असं अध्यात्म शिकवतं.

सुरेश ओबेरॉय :

हे तुम्ही खूपच चांगलं सांगितलं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर : तुमचे रिपोर्ट आलेत. तुम्हाला फक्त २४ तास उरलेत.
पेशंट : अरे देवा! मी काय करू आता?
डॉक्टर : माझी फी आजच देऊन टाका, उद्या मी सुट्टीवर चाललोय.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'सारे जहाँ से अच्छा' हे गीत कोणी लिहिले?

– मुहम्मद इक्बाल

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## बटाटे

१३) हाय कोलेस्टेरॉल, मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, संधिवात, आमवात हे विकार दूर करण्यासाठी आवळा, पुदिना, तुळस यांच्यापासून बनविलेला काढा नियमित प्यावा. यामुळे शरीराची पचनशक्ती सुधारून शरीरातील विषद्रव्ये लघवी व शौचावाटे बाहेर फेकली जातात व वरील आजार आटोक्यात राहतात. १४) पुदिन्याचा वापर वर्षभर करता यावा यासाठी पुदिना सुकवून त्याचे सूक्ष्म चूर्ण बनवून आहारामध्ये वापरावे.

सावधानता : फ्रीजमध्ये खूप दिवसांपासून ठेवलेला, सडलेला, सुगंध नाहीसा झालेला पुदिना आहारात वापरू नये. याने जंतुसंसर्गाची लागण होऊन आजार निर्मिती होऊ शकते.

प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात कायम उपलब्ध असणारी भाजी म्हणजे बटाटा होय. म्हणूनच अचानक पाहुणे आल्यानंतर अनेक वेळा बटाट्याची भाजी करून पाहुणचार केला जातो. संपूर्ण जगातसुद्धा बटाटा सर्वात जास्त लोकप्रिय आहे. सर्व देशांमध्ये भाजी म्हणून बटाट्याचा जितका उपयोग केला जातो, तितका दुसऱ्या कुठल्याच भाजीचा उपयोग केला जात नाही. यामुळेच अनेकजण बटाटाला भाज्यांचा राजा म्हणूनही संबोधतात. बटाट्याचा अनेक खाद्यपदार्थ बनविण्यासाठी उपयोग केला जातो. अशा या स्वयंपाकघरातील उपयुक्त बटाट्याला हिंदीमध्ये 'आलू' इंग्रजीमध्ये 'पोटॅटो', संस्कृतमध्ये 'आलुकः', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'सोलनम ट्यूबरोसम' या नावाने ओळखले जात असून त्याचे कुळ 'सोलॅनसी' आहे. बटाट्याचे रंगानुसार लाल व पांढरा, तर आकारानुसार लहान व मोठे असे प्रकार पडतात. दक्षिण अमेरिका हे बटाट्याचे मूळ उगम स्थान आहे. तेथून तो युरोप व नंतर युरोपातून भारतात सतराव्या शतकात प्रसिद्ध झाला.

शिवानीदीदी : हो. जगणं किंवा टिकून राहणं हा चांगला शब्द नाहीये. म्हणायचं आहे की, संघर्ष करणं, अधिकाधिक गोष्टींचा संग्रह करणं आणि काहीही करून या जगात टिकून राहणं.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर सीए शाखेचा 'खेल महोत्सव' उत्साहात



अहिल्यानगर सीए व विद्यार्थी शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय 'खेल महोत्सव' उत्साहात झाला. महोत्सवातील क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन साईनगर येथील टर्फ मैदानावर उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

नगर – अहिल्यानगर सीए व विद्यार्थी शाखेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय 'खेल महोत्सव' उत्साहात झाला. क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन साईनगरच्या टर्फ मैदानावर उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. तसेच सीए भवन येथे आयोजित चेस, कॅरम व आर्म रेसलिंग स्पर्धांचे उद्घाटन सीए मोहन बरमेचा यांच्या हस्ते, तर वाडिया पार्क येथे बॅडमिंटन, ठग ऑफ वॉर, स्विमिंग आणि फील्ड गेम्सचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व चेतन नवलानी यांच्या हस्ते झाले

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, खेळामुळे व्यक्तिमत्व विकासास चालना मिळते. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळातही सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

सीए मोहन बरमेचा यांनी सीए विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर संतुलित आहार व नियमित खेळ याच्यातील समतोलाचे महत्त्व अधोरेखित केले.

ज्ञानेश्वर खुरांगे मार्गदर्शन करताना म्हणाले की, क्रीडांगणावर शिकलेली संघभावना, नेतृत्व, शिस्त आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता ही व्यावसायिक आयुष्यातही तितकीच उपयुक्त ठरते. यश–अपयशात समतोल राखण्याची शिकवण खेळातूनच मिळते.

चेतन नवलानी यांनी खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून शारीरिक तंदुरुस्ती, ऊर्जा, आत्मसंयम आणि सकारात्मक जीवनशैली घडविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

अहिल्यानगर सीए शाखेचे अध्यक्ष अभयकुमार कटारिया यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. ते म्हणाले, संघकार्य, चिकाटी, संघटन कौशल्य आणि नेतृत्वगुण खेळातून विकसित होतात. हे गुण व्यावसायिक जीवनातही यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहेत.

सीए विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए महेश तिवारी यांनी सांगितले की, आजचा दिवस विजय–पराभवाचा नसून सहभाग, प्रयत्न, मैत्री आणि आनंदाचा आहे. खेळातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा हीच या महोत्सवाची खरी कमाई आहे.

महोत्सवात क्रिकेट, चेस, कॅरम, आर्म रेसलिंग, बॅडमिंटन, ठग ऑफ वॉर, स्विमिंग आणि विविध फील्ड गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर समारंभात वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या सदस्य सीए संजय निकम, रणजी क्रिकेटपटू अनुपम संकलेचा व ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

स्पर्धांमध्ये चेस प्रकारात सीए सुजित फिरोदिया, सीए शुभम मुथियान, सीए विशाखा वारे, सीए सुनंदा रच्चा आणि प्रिया जाधव, कॅरममध्ये सीए सुजित फिरोदिया, सीए नितेश गुगळे, पायल वरखाडे व समृद्धी भैरात, आर्म रेसलिंगमध्ये आबुजर शेख व सीए अभिनव कोठारी, स्विमिंगमध्ये अभिषेक भिंगारकर, तर मुलींच्या गटात अंशू उपाध्याय यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बॅडमिंटन स्पर्धेत सीए अक्षय कटारिया, पुष्कर भंडारी, अनुज खंडेलवाल, सीए रझा शेख, अथर्व बारस्कर आणि जितेश खुराणा यांच्या संघाने विजेतेपद पटकावले. समारोप प्रसंगी सीए महेश तिवारी यांनी स्पर्धक, परीक्षक व आयोजकांचे आभार मानले.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी शाखेचे मोक्षी बोरा, हर्षल फिरोदिया, सिद्धी गुगळे, जितेश खुराणा, ईशा कटारिया, साक्षी साठे व स्वयंसेवक म्हणून तनिश तिवारी, हर्ष बार्शीकर, ओम गोलांडे, बालाजी पालवे, सीए महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए काजल चंदे आणि सीए प्रसाद पुराणिक यांनी परिश्रम घेतले. स्पर्धांच्या यशस्वी नियोजन व सुरळीत अंमलबजावणीसाठी प्रोजेक्ट चेअरमन सीए शशांक बंग यांनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मार्ग विचारें सरळ धरवा

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




जनांनो, सावध असा. वाऱ्याने पान गळले तरी ससा कान उंचावतो. चाहूल संकटाची, ससा धरतो वाट बिळाची. आत्मरक्षणासाठी ही त्याची सिद्धता. बा माणसा, सावध राहा! म्हणजे काय पाहा ?

नीट विचार करून पाऊल टाकावे. विश्वासाने न वागावे. आपल्या बुद्धीची प्रौढी मारू नये. मी चतुर, मी चलाख, सहज हरवीन त्यांना, असू देत ते लाख लाख. असली बढाईखोर भाषा मुखी नसावी. यापायी उपाय अपाय ठरतात. पाय चुकीच्या मार्गावर पडतात. मग हा प्रमाद एक उन्माद ठरतो. त्याने सर्वस्वाचा नाश होतो. महाभारत म्हणते, तो साक्षात वधच आणि तोही आपल्याच हाताने. आपल्याच धुंदीत मस्तवालपणाने वागणाऱ्याला संपत्ती सोडून जाते. आपत्ती येउन कोसळते. संत दयाळनाथ सांगतात.

मनात आले म्हणून समुद्रात उतरणे, तर शेवटी घात न व्हावा, देणे. धैर्य धरणे, हिमतीचे झुंजणे. उगाच वाटेल तसे न बरळणे. चुकीचे तर्क लढवून अधर्म माजविणे, हे नाशाकडे जाणे.

त्याच त्याच चुका करू नका. आंधळेपणाने जगू नका. फाजील गर्व धरू नका. आयुष्याचा नाश करू नका. आपल्या हिताचे पाहा. विचारपूर्वक वागा. मनात नेहमी सावधान असावे. मग आयुष्य सुखाने जाईल, हा भरवसा बाळगावा. परंपरेने हाच मार्ग तुम्हाला वारसा म्हणून मिळाला आहे. त्यासी जपावे, असे माधवनाथ महाराज सांगतातच.

पंचतंत्रातली ही कहाणी. एक होता वाघ. एक दिवस झाला भुकेला. एका कोल्हयाच्या गुहेत शिरला. आत दडला. कोल्हा बाहेर गेला होता. तो परत येण्याची वाट पाहत बसला. कोल्हा आला की, त्याला मारावे. मग छान ताव मारावा, अशा विचारात वाघ रंगला. काही वेळातच बाहेर चाहूल लागली. कोल्हा परतल्याचीच चाहूल होती ती वाघ गुहेच्या तोंडाजवळ लपला. झेप घेण्याच्या तयारीत उभा राहिला. पण कोल्हा आत आलाच नाही. वाघ निराश झाला. गुरगुरत बाहेर पडला. काय कोल्हा आलाच नव्हता? आला होता, पण गुहेत शिरण्यापूर्वी नेहमीप्रमाणे त्याने इकडे तिकडे नजर फिरविली होती. त्याला शंका आली होती, की आत वाघ आहे. वाघाची, पावले उमटलेली होती. ती पावले आत गेलेली होती. पण परतलेली नव्हती. कोल्हा गुहेच्या दारापासून परतला. धूम पळाला.

– किशोर गांधी

# सक्षम संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त १ जुलै रोजी दिव्यांगांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर

नगर – सक्षम संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त दिव्यांग बांधवांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन १ जुलैला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत नवीन टिळक रोड येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये करण्यात आले असल्याची माहिती सक्षम संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

शिबिरामध्ये दिव्यांगांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात येणार आहेत. यामध्ये मेडिसिन तज्ज्ञ डॉ. पीयूष मराठे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. महेश वीर, डॉ. अखिल धानोरकर व डॉ. अमित कुलंगे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया वीर व डॉ. निलोफर धानोरकर, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर, कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. आनंद तुळजापुरे तसेच दंतचिकित्सक डॉ. कुलकर्णी व डॉ. कीर्ती कोल्हे हे तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरामध्ये स्त्रीरोग, दंतचिकित्सा, सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी, अस्थिरोग, कान–नाक–घसा, नेत्र तपासणी, नेत्रदान नोंदणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर आरोग्यविषयक मार्गदर्शन करणार आहेत.

दिव्यांगांना समाजाच्या आधाराची व सहकार्याची गरज असून त्यांना सक्षम व स्वावलंबी नागरिक म्हणून घडविण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून त्यांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी सहभागी होऊन दिव्यांग बांधवांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिराच्या आयोजनासाठी सक्षमचे पश्चिम प्रांत उपाध्यक्ष श्रीधर बापट, अहिल्यानगर जिल्हा युवा अध्यक्ष डॉ. राजीव चिटगोपेकर, सचिव वर्षा रोडे, सक्षमच्या उपाध्यक्षा व महिला रोजगार प्रमुख संध्या कुलकर्णी, कोषाध्यक्ष सुनील जगदाळे, सहसचिव भारती कुलकर्णी तसेच डॉ. अंजली केवळ हे परिश्रम घेत आहेत.

माहिती व नावनोंदणीसाठी इच्छुकांनी ९४२०४६१११७.

# सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश

### डॉ.विलास मढीकर यांचे प्रतिपादन; संत कबीर साहेब प्रकट दिनानिमित्त आयोजित शिबिरात २७१ भाविकांनी केले रक्तदान



सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत संत कबीर साहेब प्रकट दिवसनिमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश दिला आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे.

सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत संत कबीर साहेब प्रकट दिवस निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात २७१ रक्तपेशव्यांचे संकलन करण्यात आले.

तसेच पाच जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात आले, ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले.

यावेळी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथून आलेल्या लाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला.

मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे संत रामपाल जी महाराज यांच्या उपस्थितीत कबीर साहेब प्रकट दिवसआयोजन केले आहे. या कार्यक्रमाद्वारे शांती, एकता व सेवेचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहे.

सतलोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन आभार व्यक्त करण्यात आला.

# महेश नवमी स्नेहमेळाव्यात समाजबंध दृढ; रक्तदान शिबिरात १६१ रक्तपिशव्यांचे संकलन

### सकारात्मक विचारांमधून मानसिक शांतता, भावनिक स्थैर्य आणि सुदृढ नातेसंबंध निर्माण होतात : मानसी गगधानी



नगर – श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर यांच्या वतीने महेश नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेला स्नेहमेळावा उत्साहात, धार्मिक वातावरणात आणि समाजबंध दृढ करणाऱ्या विविध उपक्रमांनी झाला. सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, रक्तदान शिबिर, आध्यात्मिक सादरीकरणे आणि समाजातील विविध कुटुंबांच्या सहकार्यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड प्रास्तविक करून मंडळाद्वारे वर्षभर राबवण्यात येणाऱ्या कार्याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रमुख म्हणून बालमानसोपचार तज्ज्ञ प्रा.मानसी गगधानी यांनी विचारांमधील छोट्या सकारात्मक बदलांद्वारे मानसिक शांती, भावनिक स्थिरता आणि निरोगी नातेसंबंधांकडे होणारा अर्थपूर्ण प्रवास या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. सकारात्मक विचारसरणी, कुटुंबातील संवाद, परस्पर विश्वास आणि आत्मपरीक्षण यामुळे जीवन अधिक आनंदी व संतुलित बनते. प्रत्येकाने स्वतःमध्ये छोटे–छोटे सकारात्मक बदल घडवून आणले, तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावरही सकारात्मक स्वरूपात दिसून येतो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात गायत्री काबरा, विधी जाजू आणि रुई झंवर यांच्या गणेश वंदनेने झाली. अर्चना झंवर यांच्या श्लोक व मंत्र पठण साप्ताहिक वर्गातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी शिवतांडव स्तोत्र सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर भूषण मालू, रचित काबरा, रिया मणियार आणि प्रीशा सोनी यांनी महेश वंदना, आरती व भजन जॅमिंगची आकर्षक प्रस्तुती सादर केली.

कु. विहा मालू व कु. मिहिका जाजू यांनी भारतनाट्यम द्वारे सादर केलेली शिवस्तुती विशेष दाद मिळवून गेली. महिला मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनाही उपस्थितांनी प्रतिसाद दिला. मनीषा झंवर यांनी सुंदर रांगोळी साकारून कार्यक्रमस्थळी आकर्षण निर्माण केले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी श्रीगोपाल धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, प्रवीण विनोद बजाज, कृष्णगोपाल चांडक आणि सारडा परिवार यांनी विशेष सहकार्य केले. महेश नवमी उत्सवातील कार्यक्रमांचे डिजिटल डिझायनिंग सिद्धीगणेश ऑफसेटचे मनीष झंवर यांनी केले.

अमित बिहाणी व वैष्णवी लड्ढा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रकल्प अध्यक्ष म्हणून पवन बंग, अनिकेत बलदवा, विशाल झंवर आणि शाम भुतडा यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. सेक्रेटरी पियुष झंवर यांनी आभार मानले.

महेश नवमी निमित्त आयोजित रक्तदान शिबिरालाही समाजबांधवांचा प्रतिसाद लाभला. या शिबिरात १६१ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी लिमिटेड संस्थेचे चेअरमन किसनलाल रामकिसन बंग, संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धुत, उपाध्यक्ष राजेंद्र जवाहरलाल मालू यांच्यासह सर्व संचालकांनी उपक्रमाला सहकार्य केले. किसनालाल बंग यांनी त्यांचे मनोगतामध्ये उपस्थित सर्वाना रक्तदान करून या समाज हिताच्या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.

रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी प्रकल्प अध्यक्ष सुमित चांडक, संकेत मानधणे व संकेत अट्टल यांनी परिश्रम घेतले. तसेच सीए मनीष नावंदर, प्रतीक सारडा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, आदित्य काकाणी, सीए प्रणव बिहाणी, यश खटोड, ऋषी बजाज, अभिनंदन कालानी, वेदांत बजाज, भूषण काबरा आणि मधुर बिहाणी यांचेही योगदान लाभले.



आगडगाव येथील काळ भैरवनाथ देवस्थानाची नोंद 'विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झाल्याचे प्रमाणपत्र डॉ. दीपक हरके यांनी देवस्थानाचे अध्यक्ष बलभीम कराळे यांना प्रदान केले.

# अगडगावच्या काळभैरवनाथ मंदिराची 'विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

नगर – येथील काळभैरवनाथ मंदिर हे भगवान शिवाचे रौद्र रूप असलेल्या 'काळभैरव' यांना समर्पित असलेले प्राचीन मंदिर आहे. आपल्या अद्वितीय इतिहास आणि गूढ कथांसाठी प्रसिद्ध असलेल्या या मंदिराविषयी अशी मान्यता आहे की, राक्षसांनी प्रचंड आकाराचे दगड वापरून हे मंदिर एका रात्रीत उभारले होते. हे मंदिर अहिल्यानगर शहरापासून साधारण १५–२० किमी अंतरावर असलेल्या अगडगाव येथे स्थित आहे. चैत्र पौर्णिमेनंतरच्या रविवारी येथे मोठी वार्षिक यात्रा भरते. स्थानिक दंतकथेनुसार, संध्याकाळ होताच भाविक मंदिर परिसर सोडून जातात आणि त्यानंतरची रात्र देवतांची पूजा करण्यासाठी येणाऱ्या राक्षसांसाठी व आत्म्यांसाठी राखीव मानली जाते. हे मंदिर प्रचंड आणि प्राचीन अशा दगडांपासून बनलेले आहे. आख्यायिकेनुसार, अगडमल, रतडमल आणि देवमल या तीन राक्षसांनी हे मंदिर अल्पावधीत उभारले; मंदिराच्या प्रवेशद्वारावर या तीन राक्षसांची मुखवटे कोरलेली पाहायला मिळतात.

मंदिर विश्वस्त मंडळातर्फे नियमितपणे 'अन्नदान' उपक्रम राबविला जातो. विशेषतः रविवारी हजारो भाविक येथे येतात आणि बाजरीची भाकरी, भात व आमटी यांसारख्या पारंपरिक भोजनाचा आस्वाद घेतात. काळभैरवाच्या मूर्तीसोबतच या मंदिरात देवी योगेश्वरीची मूर्तीही विराजमान आहे.

आगडगाव येथील काळ भैरवनाथ देवस्थानाची नोंद 'विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये करण्यात आली आहे. विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी देवस्थानाचे अध्यक्ष बलभीम कराळे यांना प्रदान केले.

यावेळी उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड, सचिव त्रिंबक साळुंके, खजिनदार दिलीप गुगळे, सल्लागार मुरलीधर कराळे, विश्वस्त नितीन कराळे, संभाजी कराळे, तुलशीदास बोरुडे, दिलीप गायकवाड, गोरक्षनाथ जाधव, चंद्रकला खाडे आदींसह कर्मचारी, सेवेकरी महिला उपस्थित होते.

# 'स्कायब्रिय सोसायटी'मध्ये 'जल है तो कल है' उपक्रम


नगर – स्कायब्रिज सोसायटीमध्ये दर महिन्याच्या २८ तारखेला आयोजित करण्यात येणाऱ्या आनंद चालीसा जपाचे यंदाच्या महिन्याचे आयोजन निनाद भळगट व परिवार यांच्या हस्ते करण्यात आले. यंदाच्या आनंद चालीसा जपामध्ये यावर्षी चांगला व समाधानकारक पाऊस पडावा, सर्वत्र सुख–समृद्धी नांदावी यासाठीही सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

या निमित्ताने जलसंवर्धनाचा संदेश देत जल है तो कल है हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सोसायटीमध्ये पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असतानाही पाण्याचा वापर जाणीवपूर्वक कमी करण्याचा सामूहिक निर्णय सर्व रहिवाशांनी घेतला.

या उपक्रमाअंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सकाळी ७.३० ते ९ आणि सायंकाळी ७.३० ते ९ या दोन वेळांपुरताच ठेवण्यात आला. तसेच धुणे, स्वच्छता व इतर दैनंदिन कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचाही शक्य तितका काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात स्कायब्रिज सोसायटीतील रहिवाशांनी सहभाग नोंदवत जलसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारली. पाणी वाचवा, भविष्य वाचवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. याप्रसंगी स्कायब्रिज परिवाराने शहरातील नागरिकांनाही अशाच प्रकारचे जलसंवर्धनाचे उपक्रम राबवून पाण्याचा जपून व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने छोटासा संकल्प केला, तर जलसंधारणाच्या दिशेने मोठे पाऊल उचलले जाऊ शकते, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

# अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचे धनादेश केले सुपूर्त



अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचे धनादेश सुपूर्त करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून सभासदांच्या सुख–दुःखात सहभागी होणारी सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था आहे. महानगरपालिकेतील कर्मचारी दिवसभराच्या धकाधकीच्या कामकाजामुळे अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे विविध आजारांना त्यांना सामोरे जावे लागते. काही कर्मचारी आर्थिक परिस्थितीमुळे वेळेवर तपासणी व उपचार करू शकत नाहीत. आजाराचे वेळेवर निदान व उपचार होणे अत्यंत आवश्यक असल्याने पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचा हात दिला जात असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद मच्छिंद्र राजगुरू, सुभाष साठे आणि भीमसेन घोरपडे यांना वैद्यकीय उपचारासाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले.

यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसार, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, संचालक अजय कांबळे, किशोर कानडे, बलराज गायकवाड, विजय कोतकर, गुलाब गाडे, विकास गीते, सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब पवार, शेखर देशपांडे, संचालिका प्रमिला पवार तसेच कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी उपस्थित होते.

यावेळी कैलास चावरे म्हणाले की, पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे विविध निर्णय सातत्याने घेतले जात असून त्यांच्या सुख–दुःखात संस्था नेहमीच मदतीचा हात देत असते. विशेषतः वैद्यकीय उपचारांसाठी तातडीची आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याला प्राधान्य दिले जाते. सभासदांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि उपचाराअभावी कोणालाही अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी पतसंस्था कायम कार्यरत राहणार आहे, असे त्यांनी सांगितले. सभासदांनी पतसंस्थेने दिलेल्या या मदतीबद्दल समाधान व्यक्त करत संचालक मंडळाचे आभार मानले.



### सौ. जयादेवी मेढे यांना उत्कृष्ट महिला उद्योजिका विशेष पुरस्कार

जागतिक एमएसएमई दिनाचे औचित्य साधून मुंबई येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग मंत्रालयाकडून महाराष्ट्र एमएसएमई पुरस्कार २०२६ पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या सोहळ्यात उत्कृष्ट महिला उद्योजिका विशेष पुरस्कार रक्षितम ग्रोनिक्स प्रा. लि. च्या कार्यकारी संचालिका सौ. जयादेवी अनुशिल मेढे यांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असे आहे.

## केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा (मुख्य) परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी 'अमृत'कडून अर्थसाहाय्य

### पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण उमेदवारांनी १७ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत

नगर – महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा (मुख्य) परीक्षा आणि मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य योजना राबविण्यात येत आहे. सन २०२६ मधील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडून या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये तसेच मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे.

अमृतच्या लक्षित गटामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहाणा, कानबी आदी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांचा समावेश आहे.

इच्छुक उमेदवारांनी mahaamrut.org.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. अर्ज भरण्यापूर्वी संकेतस्थळावरील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानुसार अर्ज सादर करावा. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ जुलै २०२६ आहे.

योजनेसंदर्भातील सर्व माहिती व पुढील सूचना केवळ अमृतच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी किंवा ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शनासाठी जिल्हा अमृत कार्यालय, शिंगवी ज्वेलर्स शेजारी, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## लहुजी वस्ताद साळवे यांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी केडगावमधील 'सकल मातंग समाजाची एकजुट'

### अप्पू हत्ती चौकात पुतळा उभारण्याची एकमुखी मागणी; बैठकीसाठी समाज बांधवांची उपस्थिती



आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे (जुना अप्पू हत्ती) चौक येथे सध्या उभारण्यात आलेल्या अश्वाच्या ठिकाणी लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी केडगावातील सकल मातंग समाजाची बैठक केडगाव येथे पार पडली.

नगर – शहरातील आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे (जुना अप्पू हत्ती) चौक येथे सध्या उभारण्यात आलेल्या अश्वाच्या ठिकाणी लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी केडगावातील सकल मातंग समाज एकवटला आहे. या मागणीसंदर्भात छत्रपती शिवाजी मंगल कार्यालय, अंबिकानगर (केडगाव) येथे सकल मातंग समाजाची बैठक पार पडली. या बैठकीत समाजबांधवांनी एकमुखाने अश्वारूढ पुतळ्याची मागणी करत ती महापालिकेच्या महासभेत मंजूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

बैठकीस उपस्थित नगरसेवकांनी समाजाच्या भावनांचा आदर राखत हा विषय महापालिकेच्या आगामी महासभेच्या अजेंड्यावर घेऊन बहुमताने मंजूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असा शब्द समाजबांधवांना दिला. बैठकीच्या प्रारंभी केडगाव सकल मातंग समाजाचे समन्वयक प्रा. विशाल पाचारणे यांनी समाजबांधवांचे स्वागत केले. त्यानंतर झालेल्या मेळाव्यात माजी प्राचार्य ना. म. साठे, रविंद्र शेलार, निवृत्ती साळवे, मनोज साठे, सयाजी अवचिते, विकास उडानशिवे, भगवान जगताप, संदीप सकट आणि श्याम वैराळ यांनी मार्गदर्शनपर मनोगते व्यक्त केली. सर्वांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या कार्याला साजेसा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

कार्यक्रमास नगरसेवक दत्ता गाडळकर आणि वर्षाताई काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी समाजाच्या मागणीबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करत संबंधित प्रस्ताव महापालिकेच्या महासभेत मांडून मंजूर करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले इंजि. सुधाकर पाचारणे यांनी स्मारक उभारणीसाठी समाजाने आता अधिक संघटितपणे पुढे येण्याची गरज असल्याचे सांगितले. लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकासाठी पुढील काळात आर्थिक निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. समाजाच्या सहकार्याने हा लढा यशस्वी करू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात अ‍ॅड. प्रदीप सकट यांनी महापालिकेच्या निधीचा वापर आणि संबंधित जागेच्या हस्तांतरणासंदर्भातील कायदेशीर बाबी नगरसेवकांसमोर मांडल्या. अशा ऐतिहासिक स्थळी समाजाच्या भावना लक्षात घेऊन योग्य निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठक यशस्वी करण्यासाठी धनंजय पाचारणे, सनी पाचारणे, राजू बोरगे, महेश लोखंडे, विष्णू लोखंडे, संतोष उमाप, अक्षय बोरगे, गोरख लोखंडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी नियोजन आणि व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. यावेळी माजी नगरसेवक अनिल शेकटकर, सुनिल उमाप, अश्विनी पाचारणे, श्रुती लोखंडे, आशा ससाणे, उषा शिंदे, पूनम पाचारणे, आशा पाचारणे, अमित भांड, वैभव पाचारणे, संजय बोरगे, उद्योजिका रेश्मा पाचारणे, आदित्य उमाप, पियूष बोरगे, किरण पाचारणे यांच्यासह केडगाव परिसरातील मातंग समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विशाल पाचारणे यांनी केले. समिती अध्यक्ष संतोष साळवे यांनी आभार मानले.

### लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकासाठी समाजाची एकजूट

बैठकीत उपस्थित सर्व समाजबांधवांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक चौकात त्यांचाच अश्वारूढ पुतळा उभारणे ही समाजाची केवळ मागणी नसून ऐतिहासिक न्यायाची बाब असल्याचे मत व्यक्त केले. समाजाच्या भावना लक्षात घेऊन महापालिकेने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी एकमुखी मागणी या बैठकीत करण्यात आली.

## राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन आणि सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन

### अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्टस असोसिएशनचा उपक्रम

नगर – अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्टस असोसिएशनच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या स्व. सेठ शामसुंदरजी बिहाणी (बंगडीवाला) स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा व स्व. मनीष कुलकर्णी स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत स्पर्धांचे आयोजन अहिल्यानगर शहरात करण्यात आले आहे, अशी माहिती अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्टस असोसिएशनचे अध्यक्ष अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे यांनी दिली.

राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा १८ जुलै रोजी होणार असून या स्पर्धेचे हे सलग २३ वे वर्ष आहे. ही स्पर्धा इयत्ता पाचवी ते सातवी व इयत्ता आठवी ते दहावी या दोन गटात होणार आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून सतत २३ वर्ष नाट्य, चित्रपट, साहित्य व सांस्कृतिक जडणघडणीच्या दृष्टीने शालेय विद्यार्थ्यांमधून नवी पिढी घडविण्याचे कार्य सुरू आहे. तसेच राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत स्पर्धा १९ जुलैला होणार असून ही स्पर्धा पाचवी ते दहावी या वयोगटासाठी आहे.



स्व. मनीष कुलकर्णी



स्व.सेठ शामसुंदरजी बिहाणी

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण नाट्य, चित्रपट अभिनेत्री ऋजुता देशमुख यांच्या हस्ते १९ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या दोन्ही स्पर्धेसाठी आकर्षक रोख बक्षिसे प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येणार असून विशेष सर्वसाधारण विजेतेपदाचा सांघिक करंडकही देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठीच्या प्रवेशिका अमृतेश्वर किराणा स्टोअर्स पाईपलाईन रोड व यज्ञ मेडिकल होशिंग हॉस्पिटल जवळ येथे उपलब्ध करून दिल्या असल्याची माहिती स्पर्धा प्रमुख संतोष बडे यांनी दिली.

स्पर्धेच्या प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख १४ जुलै असून माहितीसाठी विक्रांत मनवेलीकर ९४२२२२३३१७, मंगेश देवचके ९८२२२०८६४८, संतोष बडे ९८२३३८५११५६, उपेंद्र कुलकर्णी ७७९८०००५६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कामोद खराडे, प्राची कुलकर्णी, दादासाहेब बेरड, अमोल दाते, श्रीनाथ केसकर यांनी केले आहे.

## राजेंद्र खुंटाळे यांचा ५ जुलैला सेवापूर्ती गौरव समारंभ



नगर – अहिल्यानगर जिल्हा देखरेख संघाचे सचिव तसेच तालुका सुपरवायझर या पदांवर कार्यरत राहून प्रदीर्घ सेवा बजावणारे राजेंद्र खुंटाळे ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. खुंटाळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ ५ जुलै रोजी सकाळी १० वाजता निंबळक येथील सार्थक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास आ.अक्षय कर्डिले, आ.काशिनाथ दाते, पद्मश्री पोपटराव पवार आदींसह उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मिनाक्षी खुंटाळे, पायल खुंटाळे, प्रगती सरोदे, मयूर खुंटाळे, सोनाली जगधने, ओंकार खुंटाळे, निंबळक, इसळक ग्रामस्थ व खुंटाळे मित्र परिवाराने केले आहे.



नालेगाव भागातील श्री चौंडेश्वरी मंदिराचा तृतीय वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला याप्रसंगी उपस्थित असलेल्या महिला भाविक.

## श्री चौंडेश्वरी मंदिराचा वर्धापनदिन साजरा

नगर – नालेगाव भागातील श्री चौंडेश्वरी मंदिराचा तृतीय वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. तीन वर्षांपूर्वी देवांग कोष्टी समाज सेवा मंडळाच्या समाज बांधवांनी एकत्र येत श्री गणपती मंदिर, श्री चौंडेश्वरी मंदिर व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. या जागेवर जवळपास ७५ वर्षांपासून श्री चौंडेश्वरी देवीचे मंदिर आहे.

तृतीय वर्धापन दिनानिमित्ताने देवांना अभिषेक व सत्यनारायणाची पूजा करण्यात आली. मिलिंद व मोहिनी पंदारे यांच्या हस्ते हा धार्मिक कार्यक्रम पार पडला. देवांग कोष्टी महिला मंडळाने कुंकूमार्चन कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना प्रसाद वाटण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाडच्या विविध विषयातील परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूल, नगरच्या विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश



नगर – आंतरराष्ट्रीय स्तरावरील आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाड (राऊंड–२) च्या विविध विषयांच्या परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विविध देशांतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धात्मक परीक्षेत पोदारच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बौद्धिक क्षमता, तार्किक विचारशक्ती आणि विषयांवरील प्रभुत्व सिद्ध करत राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्यांना चालना देणे, त्यांच्यातील विश्लेषण क्षमता, तर्कशक्ती आणि विषयांचे सखोल ज्ञान विकसित करणे हा आंतरराष्ट्रीय टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेचा प्रमुख उद्देश आहे. या परीक्षेत पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, गणित, हिंदी आणि विज्ञान या विविध विषयांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत उच्च गुणवत्ता प्राप्त केली.

इयत्ता पहिलीतील नितीन निरज मेश्राम याने राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत रु. २,००० ची शिष्यवृत्ती प्राप्त केली. इयत्ता तिसरीतील वेदिका विकास कोरडे हिने राज्यात तृतीय क्रमांक मिळवत रु. १,२०० ची शिष्यवृत्ती पटकावली. तसेच इयत्ता तिसरीतील साईशा अमोल बागुल हिने राज्यात पाचवा क्रमांक मिळवत रु. १,००० ची शिष्यवृत्ती मिळवली. याशिवाय, इयत्ता पहिलीतील सानवी जामोदकर आणि आराध्या तापरे यांनी झोनल स्तरावर स्थान मिळवत सुवर्णपदक (गोल्ड मेडल) आणि रु. १,००० चे गिफ्ट व्हाउचर प्राप्त केले. इयत्ता पहिलीतील अद्विक अदे तसेच इयत्ता तिसरीतील तनिष्का रेडगावकर यांनी प्रत्येकी रु. ५०० चे गिफ्ट व्हाउचर मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, सीनियर अ‍ॅडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव, अ‍ॅडमिन ऑफिसर नितीन गवांदे तसेच शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.



बालरंगभूमी परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा महाराष्ट्रातील सर्व शाखांचे पदाधिकारी व सभासदांच्या उपस्थितीत पुणे येथे झाली.

## 'बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखे'तील ३ पदाधिकाऱ्यांची राज्य कार्यकारिणीवर नियुक्ती

पुणे – महाराष्ट्रातील बालकलाकारांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या आणि राज्यभरात बालनाट्य चळवळ गतिमान करणाऱ्या बालरंगभूमी परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा २८ जून रोजी महाराष्ट्रातील सर्व शाखांचे पदाधिकारी व सभासदांच्या उपस्थितीत सिद्धी साज बँक्वेट्स हॉल, पुणे येथे उत्साहात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी परिषदेच्या अध्यक्षा अ‍ॅड. निलम शिर्के– सामंत होत्या. यावेळी २०२६– २७ च्या कार्यकाळासाठी मध्यवर्ती कार्यकारणीत काही बदल करण्यात आले.

अहिल्यानगर शाखेच्या सांस्कृतिक आणि नाट्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे मध्यवर्ती पातळीवर मानाचे स्थान मिळाले असून देवीप्रसाद सोहोनी यांची मध्यवर्ती कार्यकारी मंडळात निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच युथ टीमच्या राज्य महिला संघटकपदी तेजा पाठक यांची तर तेजस अतितकर यांची जिल्हा संघटकपदी नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी प्रकाश पारखी (प्रमुख सल्लागार), राजीव तुलालवार (कार्याध्यक्ष), अ‍ॅड.शैलेश गोजमगुंडे (उपाध्यक्ष), डॉ.दीपा क्षीरसागर (उपाध्यक्ष), सतीश लोटके (प्रमुख कार्यवाह), योगेश शुक्ल (प्रभारी, प्रमुख कार्यवाह), नंदकिशोर जुवेकर (कोषाध्यक्ष) आसेफ शेख, दिपाली शेळके (सहकार्यवाह), अनंत जोशी (कार्यकारिणी सदस्य) आदी मध्यवर्तीचे पदाधिकारी उपस्थित होते.

बालरंगभूमी परिषदेचे मुख्य उद्दिष्ट मनोरंजनातून प्रबोधन करणे असून फक्त नाट्य क्षेत्राशी संबंधित न राहता नृत्य, गायन, वादन, लोककला इत्यादी कला प्रकारच्या प्रचार आणि प्रसारासाठी कटिबध्द आपण आहोत. सोशल मीडियाच्या जगात हे कार्य अधिक गतिमान करण्यासाठी आणि तरुण पिढीचे विचार डिजिटल टच सह सर्व वयोगटातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी युथ टीम प्रभावीपणे कार्य करेल अशी अपेक्षा अध्यक्षा अ‍ॅड. निलम शिर्के– सामंत यांनी यावेळी व्यक्त केली.

या नियुक्तीबद्दल तिन्ही रंगकर्मींचे परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे, प्रमुख कार्यवाह शैलेश देशमुख यांसह सागर अलचेट्टी, सोनाली दरेकर, प्रशांत सूर्यवंशी, विराज अडगटला, सपना साळुंके, सुजाता पायमोडे, टीना इंगळे, श्रिया देशमुख, ऋतुजा पाठक यांनी अभिनंदन करीत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थिनींसाठी आरोग्य, स्वच्छता व सजग जीवनशैलीवर मार्गदर्शन



नगर – अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थिनींसाठी Empowering Girls: Health, Hygiene and Mindful Living या विषयावर विशेष आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सिमरन वाधवा उपस्थित होत्या. यावर्षी त्यांनी गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान कडून मुलींसाठी घेण्यात येणाऱ्या सखी ह्या नवीन प्रकल्पाची सुरवात सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल पासून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्रीमती तस्नीम हकीमजीवाला यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गीता तांबे यांनी पाहुण्यांचा सत्कार करून आपल्या मनोगतात विद्यार्थिनींनी आरोग्य, स्वच्छता व सकारात्मक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. सिमरन वाधवा यांनी आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील स्वच्छता, पौगंडावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल, संतुलित आहार, स्वच्छ सवयी तसेच सजग व निरोगी जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन करत त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून माहिती दिली. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढण्यास व आरोग्याविषयी योग्य जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

या कार्यक्रमास माता पालकही उपस्थित होत्या. त्यांच्याही अनेक शंकांचे निरसन डॉ. सिमरन वाधवा यांनी केले.

कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थी प्रतिनिधी इशिता लोंढे हीने आभार प्रदर्शन करून केला. उपस्थित विद्यार्थिनींनी कार्यशाळेला प्रतिसाद देत मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमास शाळेच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा, महिला शिक्षिकां बरोबरच माता पालक उपस्थित होत्या.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान हे सर्वच मॅनेजमेंट मेंबर्स विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असे नवनवीन कार्यक्रम घेण्यासाठी सर्वांना प्रोत्साहन देत असतात.

# अंड्यांची गरमागरम भजी

झटपट रेसिपी



दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.




## फंटू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# महिन्याला लाखोंची कमाई

अचिव्हर


झारखंडमधील लोहरदगा जिल्ह्यातील सेन्हा प्रखंडातील सिठिओ गावचा रहिवासी असलेला अवघ्या २६ वर्षांचा रूपेश कुमार साहू आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. एखाद्या यशस्वी व्यक्तीमागे संघर्षाची कहाणी असते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे रूपेश. बहुतेक युवक शिक्षण घेत असतात अशा वयात त्याने व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला आणि आज त्याच्या यशाची चर्चा केवळ लोहरदग्यापुरती मर्यादित नसून आसाम आणि नागालँडसारख्या राज्यांपर्यंत पोहोचली आहे.

रूपेशने १९ एप्रिल २०१७ रोजी डुक्करपालन व्यवसायाला सुरुवात केली. त्या वेळी त्याचे वय केवळ १७ वर्षे होते. व्यवसाय उभारण्यासाठी त्याला सुरुवातीला सुमारे सहा लाख रुपयांची गरज होती. ही रक्कम त्याने लोकांकडून कर्ज घेऊन उभी केली. कुटुंबीय त्याच्या निर्णयावर नाराज होते. इतकेच नव्हे तर काहींनी त्याला घर सोडण्याचाही सल्ला दिला; मात्र रूपेशने हार मानली नाही आणि आपल्या ध्येयावर ठाम राहिला. डुक्करपालन सुरू करण्यापूर्वी तो डुक्कर चारण्याचे काम करत होता. त्यामुळे या व्यवसायाचे स्वरूप आणि त्यातील संधी याची त्याला चांगली माहिती होती. केवळ ४० डिसमिल जमिनीवर त्याने व्यवसायाची सुरुवात केली. रांचीहून २४ मादी, २ नर डुक्करे आणि ५० पिल्ले



आणून त्याने फार्म सुरू केला. हळूहळू व्यवसाय वाढत गेला आणि त्याला यश मिळू लागले. आज रूपेशकडे तब्बल ८०० डुक्करे असून तो दोन आधुनिक डुक्करपालन केंद्रांचा मालक आहे. सर्व खर्च वजा केल्यानंतर त्याला दरमहा किमान ८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. त्याच्या व्यवसायामुळे अनेकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. रूपेशच्या मते, डुक्करपालन हा कमी खर्च, कमी मेहनत आणि अधिक नफा देणारा व्यवसाय आहे. समाजात अजूनही डुक्करपालनाबद्दल काही गैरसमज आहेत. अनेकांना तो अस्वच्छ व्यवसाय वाटतो; मात्र योग्य व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास यातून लाखो रुपयांची कमाई करता येते, असे तो सांगतो. डुक्कराच्या एका पिल्लाचे वजन साधारण १० ते १२ किलो असते आणि त्याची किंमत सुमारे ६ हजार रुपये असते. सात महिन्यांमध्ये त्याचे वजन एक क्विंटलपेक्षा अधिक होते.

## ॲप वर्ल्ड




### व्हॉट्सॲपचा नवा अनुभव

व्हॉट्सॲप वापरणाऱ्या प्रत्येकाला आता एक मस्त सरप्राइज मिळणार आहे. तीन वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अखेर मेसेजिंगचा अनुभव पूर्णपणे नवा आणि सोपा होणार आहे. छोट्या छोट्या गोष्टींमध्येही मोठा बदल दिसणार असल्याने करोडो यूजर्स खूश होणार आहेत. अँड्रॉइड बीटा आवृत्तीमध्ये नुकतेच हे अपडेट उपलब्ध झाले आहे. बीटा टेस्टिंग मिळणाऱ्या युजर्सना आधीच नवीन मेन्यू दिसू लागला आहे. लवकरच तो सर्वांसाठी येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. 'वेबेटा इन्फो'ने याबाबत स्क्रीनशॉट्स शेअर करून सगळ्यांची उत्सुकता वाढवली आहे. कोणत्याही मेसेजवर फक्त बोट ठेवले, की आता बाजूला एक सुंदर, स्पष्ट नवीन मेन्यू उघडेल. जुना मेन्यू आता इतिहासजमा होईल. नवीन डिझाइनमुळे पर्याय पटकन दिसतील आणि वापरकर्त्यांची मोठी सोय होईल. ग्रुप चॅट असो, की पर्सनल चॅट, दोन्ही ठिकाणी हे फीचर काम करेल. नवीन टेक्स्ट मेन्यू अधिक मोठा आणि स्पष्ट दिसेल. त्यामुळे रात्री किंवा उजेडातही सहज पर्याय निवडता येतील. अँड्रॉइड आणि आयओएस अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्सवर हा बदल येईल, फक्त थोडे फरक असतील. मुख्य मेन्यू मात्र जसाच्या तसाच राहील. फक्त लुक आणि फील अधिक मॉडर्न झाला आहे. व्हॉट्सॲपने मेसेज मेन्यू रिडिझाइन करण्यासाठी बराच काळ घेतला. रिपोर्टनुसार, 'रिडिझाईन मेसेज मेन्यू' हे फीचर अनेक वर्षांपासून अपेक्षित होते. बीटा वापरकर्त्यांना आता मिळत असल्याने ते लवकरच सर्वांसाठी रिलीज होईल. दररोज लाखो मेसेजेस पाठवणाऱ्या लोकांसाठी हा बदल छोटा वाटला, तरी वापर अधिक वेगवान आणि आनंददायक होईल.

# पुरुषही फॅशनकडे आकृष्ट

फॅशन पॅशन



एकेकाळी पुरुष फॅशनकडे फारसे लक्ष देत नसत; मात्र काळ बदलत गेला तसे पुरुषांमध्येही फॅशनविषयीची जागरूकता वाढू लागली. यामागे कॉर्पोरेट क्षेत्रातील वाढता सहभाग हे एक महत्त्वाचे कारण ठरले. आजच्या स्पर्धात्मक वातावरणात प्रत्येक व्यक्तीने सादरीकरणक्षम आणि आकर्षक दिसणे आवश्यक मानले जाते. परिणामी, पुरुषांच्या फॅशनविश्वात झपाट्याने बदल होत असून डिझायनर्सही नवनवीन प्रयोग करण्यात पुढे असतात. आरामदायी 'ॲथलीझर' शैलीपासून ते जेंडर-न्यूट्रल फॅशनपर्यंत अनेक नवे ट्रेंड लोकप्रिय होत आहेत.

२०२६ मध्ये विशेषतः पारंपरिक भारतीय आणि आधुनिक पाश्चात्त्य शैलीचा संगम असलेले फ्यूजन फॅशन अधिक लोकप्रिय होत आहे. कुर्ता-जीन्स, आकर्षक नेहरू जॅकेट्स आणि साधेपणाला प्राधान्य देणारी 'मिनिमलिस्ट' फॅशन यांना मोठी पसंती मिळत आहे. ही शैली केवळ आकर्षकच नाही, तर टिकाऊ फॅशनच्या संकल्पनेलाही प्रोत्साहन देते. या पार्श्वभूमीवर लॅक्मे फॅशन वीक २०२६ मध्ये पुरुषांच्या फॅशनचा विशेष जलवा पाहायला मिळाला. 'द बॉईज क्लब'सह अनेक नामवंत डिझायनर्सनी आधुनिक, धाडसी आणि स्टायलिश मेन्सवेअर सादर केले. यंदाच्या रॅम्पवर धारदार कट्स, उठावदार रंगसंगती, सिल्क कोट, ड्रेप्ड धोती पॅन्ट, भरतकाम केलेल्या शेरवानी आणि जेंडर-न्यूट्रल फॅशनचा अनोखा मिलाफ पाहायला मिळाला.



# राजस्थानात थंड हवेचा अनुभव देणारी ठिकाणे

भटकंती


जून आणि जुलै महिन्यात सुद्धा वातावरणात थोडीफार उष्णता असते. आता काही दिवसांनी मॉन्सून सुरू होणार आहे. त्यामुळे या आल्हाददायक वातावरणात लोक अनेकदा थंड ठिकाणांच्या शोधात असतात. काहीजण हे हिमाचल किंवा उत्तराखंडमधील ठिकाणे 'एक्सप्लोर' करतात. पण राजस्थानमध्ये अशी अनेक ठिकाणे आहेत, जी उन्हाळ्याच्या दिवसातही थंड असतात. यामध्ये माऊंट अबू, गुरु शिखर आणि राणकपूर यांचा समावेश आहे. राजस्थानमधील ही थंड ठिकाणे पावसाळ्यात हिरवळीच्या चादरीत न्हाऊन निघतात. राजस्थानमध्ये फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल, तर या ठिकाणांना नक्की भेट द्या.

**माऊंट अबू** – माऊंट अबूमध्ये उन्हाळ्यातही हवामान आल्हाददायक असते. पावसाळ्यात येथील निसर्गदृश्य खरोखरच मनमोहक असते. तिथे बोटिंगदेखील करू शकता. सुंदर डोंगर रागांचा दृश्यांचा आनंद घेऊ शकता आणि दिलवारा मंदिराला भेट देऊ शकता.

**गुरु शिखराचे दृश्य** – गुरु शिखर हे अरवली पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर असून ते समुद्रसपाटीपासून अंदाजे १,७२२ मीटर उंचीवर वसलेले आहे. हे ठिकाण उंच ठिकाणी वसलेले असल्यामुळे येथिल हवामान खूपच थंड असते. येथे दत्तात्रेय मंदिर देखील आहे. त्याला तुम्ही भेट देऊ शकता. हे मंदिर देखील भाविकांमध्ये खूप लोकप्रिय आहे.

**राणकपूर** – राणकपूर हे भव्य जैन स्थापत्यकलेसाठी आणि नैसर्गिक हिरवळीसाठी प्रसिद्ध आहे. अरवली पर्वतरांगांनी वेढलेल्या या परिसरात शांत वातावरण आणि थंड हवामान आहे. प्रसिद्ध राणकपूर जैन मंदिर कलात्मक कोरीव संगमरवरी शिल्पांसाठी जगभर ओळखले जाते. आल्हाददायक हवामानाचा आनंद घेण्यासाठी उन्हाळ्यात येथे भेट द्या.

## टेक्नो टॉक





### स्कॅम ओळखण्यासाठी नवी सुविधा

आजकाल फोन वाजला, की मनात शंका येते. आईचा आवाज, मित्राचे नाव, किंवा बॉसचा नंबर... पण खरेच ते आहेत का? 'गूगल'ने आता अशा भयानक 'एआय' स्कॅम्सना रोखण्यासाठी अँड्रॉइडसाठी एक जबरदस्त सुविधा आणली आहे. फसवणूक करणारे आता जुनी पद्धत सोडून नव्या युक्त्या वापरत आहेत. ते 'एआय' ने आवाज क्लोन करतात, नंबर बनावट दाखवतात आणि आपल्या प्रियजनांचे रूप घेऊन पैसे मागतात. 'लगेच पैसे पाठव' अशा भावनिक कॉल्समुळे अनेकजणांना लाखो रुपयांचा गंडा बसतत आहे. ही समस्या इतकी गंभीर झाली आहे, की सुरक्षा तज्ज्ञांनाही फरक ओळखणे कठीण होऊ लागले आहे.

गुगलने 'फोन बाय गूगल' ॲपमध्ये ळ्एआय आधारित 'स्कॅम कॉल डिटेक्शन' ही सुविधा रोलआउट करण्यास सुरुवात केली आहे. ही सुविधा फक्त कॉल कसा ऐकू येतो यावर अवलंबून राहत नाही, तर कॉल कोणत्या डिव्हाइसवरून येत आहे याची तपासणी करते. तुमचा खरा संपर्क 'फोन बाय गूगल' ॲपद्वारे कॉल करतो, तेव्हा त्याच्या फोनकडून पार्श्वभूमीत एक सिक्युरिटी पिंग पाठवला जातो. हा डिजिटल हँडशेक यशस्वी झाला तर कॉल खरा असल्याचे समजते; पण स्कॅमरने नंबर स्पूफ केला तर हे हँडशेक होत नाही. लगेच तुमच्या फोनवर इशारा दिसतो, 'हा कॉल संशयास्पद आहे, सावध रहा!' 'क्लोन' केलेला आवाज कितीही खरा वाटला, तरी डिव्हाइस चेक केल्याने गुगल खोट्या कॉलला ओळखते. आपल्या आई-वडिलांना किंवा मित्रांना अपघात झाला म्हणून पैसे मागणाऱ्या कॉल्सना आता चांगलाच आळा बसणार आहे.

# लावा व्यायामाची सवय

फिटनेस फंडा



उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. तुम्हीही व्यायाम उद्यावर ढकलताय का? सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का? सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरुवात करा. ही सवय लावून घेण्यासाठी काय करायचं याविषयी...

* सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. सकाळी लवकर उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. आठ तासांची शांत झोप घेतल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. त्यामुळे दररोज लवकर उठण्याची सवय लावा.
* जीमला जाताना एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घ्या. कोणीतरी सोबत असेल तर तुम्हालाही जीमला जाण्यात रस वाटेल. मस्त गप्पा मारत जीममध्ये जाण्याचा आनंद वेगळाच असतो.
* जवळची जीम शोधा. लांबवरच्या जीममध्ये जायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी जवळच्या जीमचं सदस्यत्व घेतलं तर तुमचा वेळही वाचू शकेल.
* आपल्याला वजन कमी करायचं आहे असा दृढनिश्चय करा. एखाद्या दिवशी आपल्याला खूप कंटाळा येईल. पण हा कंटाळा बाजूला ठेऊन व्यायाम करायला जा. कंटाळ्यापेक्षाही व्यायाम जास्त महत्त्वाचा आहे.
* तुमचं वजन एका दिवसात वाढलेलं नाही. तसंच ते पटकन कमीही होणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्या. झटपट निकालांची अपेक्षा करू नका.

# पेटीएममध्ये मोठी कर्मचारी भरती

रोजगारवाटा

देशातील प्रमुख फिनटेक कंपन्यांपैकी एक असलेल्या पेटीएम या कंपनीने एक खुशखबर दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार या कंपनीकडून पुढील साधारण नऊ महिन्यांमध्ये एकूण चार हजार नव्या कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. ही भरती प्रक्रिया झाल्यानंतर प्रत्येकाच्या कामगिरीचा अभ्यास करून एकूण चारशे कर्मचारी कमीदेखील केले जाणार आहेत. पेटीएम कंपनी आगामी काळात आपल्या मर्चंट नेटवर्कला मजबूत करणार आहे. तसेच भविष्यात ही कंपनी 'एआय'वर आधारित सेवांवरही भर देणार आहे.

त्यामुळेच या कंपनीकडून तब्बल चार हजार नव्या कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे.

पेटीएमने ही भरती प्रकिया मार्च २०२७ पर्यंत राबवली जाईल, असे सांगितले आहे. कंपनीने सांगितल्यानुसार गेल्या दोन महिन्यांमध्ये आठशेहून अधिक लोकांना पेटीएममध्ये नोकरी देण्यात आली आहे. आता आणखी चार हजार कर्मचाऱ्यांना नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही नवी भरती प्रॉडक्ट, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्ता या विभागात केली जाणार आहे. आपल्या मर्चंट नेटवर्कला वेगाने वाढवण्यासाठी तसेच 'एआय'वर आधारित सर्व्हिसचा आणखी विस्तार करण्यासाठी ही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. सध्या पेटीएम कंपनीकडे ४० हजार कर्मचारी काम करतात. त्यानंतर आता कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये आणखी दहा टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

एकीकडे पेटीएम भविष्यात एकूण चार हजार कर्मचाऱ्यांची भरती करणार आहे, असे सांगण्यात आले आहे; परंतु दुसरीकडे 'परफॉर्मन्स अप्रेजल सायकल' पूर्ण झाल्यानंतर साधारण एक टक्का म्हणजेच चारशे कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले जाणार आहे.

# संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकता

स्टार्ट अप वर्ल्ड



आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकता हे आर्थिक आणि सामाजिक विकासाचे अत्यावश्यक स्तंभ बनले आहेत. तंत्रज्ञानातील प्रगती, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि डिजिटल परिवर्तनामुळे जगभरातील उद्योग आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अशा स्पर्धात्मक वातावरणात नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देतील तेच देश भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करतील हे उघड आहे.

काळाची हीच गरज ओळखत, तरुण लोकसंख्येचा सक्षम वापर करत आणि तंत्रज्ञानाची साथ घेत भारत जगातील प्रमुख स्टार्टअप केंद्रांपैकी एक म्हणून वेगाने उदयास येत आहे. भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकोसिस्टीम असलेला देश म्हणून ओळखला जातो. गेल्या दशकात फिनटेक, हेल्थटेक, ॲग्रीटेक, एडटेक, इलेक्ट्रिक मोबिलिटी, नवीकरणीय ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये हजारो स्टार्टअप्स उदयास आले आहेत. भारतातील विकसित शहरांपैकी पुणे हे शिक्षण, तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. शहरात अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालये, आयटी कंपन्या, उत्पादन उद्योग, वाहन उद्योग आणि संशोधन संस्था कार्यरत आहेत. यामुळे नवकल्पना आणि स्टार्टअप विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

नवीन कल्पनांच्या प्रयोगशाळा या उद्योजकतेची संस्कृती विकसित करण्यासाठी महत्त्वाच्या ठरत आहेत. या प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांना प्रयोग करण्याची, प्रोटोटाइप विकसित करण्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यावहारिक उपाय शोधण्याची संधी मिळते. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी), डेटा सायन्स आणि इलेक्ट्रिक वाहने यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होते. नवकल्पनांसोबतच संशोधन संस्कृती विकसित करणेही तितकेच आवश्यक आहे. संशोधन हे तांत्रिक प्रगती आणि शाश्वत विकासाचा पाया आहे. 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी संशोधन आणि नवकल्पना अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

उद्योजकतेला बळकट करण्यासाठी इन्क्युबेशन सहाय्य हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. योग्य मार्गदर्शन, पुरेसा निधी, नेटवर्किंग आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे ज्ञान यामुळे तरुणांच्या कल्पना यशस्वी उद्योगांमध्ये रूपांतरित होण्यास मदत होते. संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकता या आता पर्यायी संकल्पना नसून देशाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक गरजा बनल्या आहेत. शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांनी एकत्रितपणे संशोधन आणि स्टार्टअप विकासाला प्रोत्साहन देणारी मजबूत परिसंस्था निर्माण करणे आवश्यक आहे. याच माध्यमातून आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक भारताची निर्मिती शक्य होईल.

# पाण्यापासून मोबाईलचे संरक्षण करायचेय ?

काळजी घ्या



पावसाळा सुरू झाला आहे. देशभरात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडत आहे. भारतीय हवामान खात्याने २० हून अधिक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यात उत्तराखंड, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्य भारताचा समावेश आहे. अशा वेळी ऑफिस, कॉलेज किंवा बाहेर जाताना फोनचे पाण्यापासून संरक्षण करणे गरजेचे आहे. पावसात फोन खराब होऊ नये, यासाठी पाच सोप्या टिप्स जाणून घ्या.

१. पावसाळ्यात वॉटरप्रूफ फोन केस घेणे महत्त्वाचे आहे. या फोन केसला पाणी आणि ओलाव्यापासून वाचवण्यासाठी बनवलेले असते. बाजारात अनेक प्रकारच्या वॉटरप्रूफ केस उपलब्ध आहेत. तुमच्या फोन मॉडेलला सुट होईल अशी केस निवडा. यामुळे पाण्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल.

२. वॉटरप्रूफ केस वापरणे शक्य नसेल तर फोन सीलबंद वॉटरप्रूफ पाऊचमध्ये ठेवा. पाऊच पूर्णपणे बंद होत आहे आणि पाणी आत जाणार नाही, याची खात्री करा. पाऊचमध्ये सिलिका जेलचे छोटे पॅकेट ठेवा. ते ओलावा शोषून घेईल. पाऊच स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे.

३. पावसात फोनचे नुकसान टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पावसात फोन वापरू नका. फोन खिशात किंवा बॅगेत ठेवा. कॉल किंवा मेसेज पाठवायचा असेल, तर थांबून कोरड्या जागेची निवड करा. पाण्याच्या संपर्कात फोन येणे टाळा.

४. चुकून फोन ओला झाला, तर घाबरू नका. मऊ कापडाने किंवा टिश्यू पेपरने फोन पुसा. पाणी शोषण्यासाठी फोन तांदळाने भरलेल्या भांड्यात २४ तास ठेवा. तांदूळ ओलावा शोषून घेतात. यामुळे फोनचे नुकसान टाळता येईल. फोन बंद करून बॅटरी काढता येत असेल, तर काढा.

५. फोन खरेदी करताना त्याची आयपी रेटिंग तपासा. आयपी ६७ किंवा आयपी ६८ रेटिंग असलेले फोन पाणी आणि धुळीपासून सुरक्षित असतात. असे फोन पावसात किंवा पाण्याच्या संपर्कात आले, तरी खराब होण्याची शक्यता कमी असते. नवीन फोन घेताना हे रेटिंग नक्की तपासा.

# ‘गाईडेड बोन रिजनरेशन’ व अँटेरिअर इम्प्लांटच्या सौंदर्य व्यवस्थापनाचे प्रगत प्रशिक्षण अहिल्यानगर येथील डॉ. स्वाती चंगेडिया यांनी केले पूर्ण



इम्प्लांटोलॉजिस्ट डॉ. रत्नदीप पाटील यांच्या हस्ते सर्टिफिकेट स्वीकारताना डॉ. स्वाती चंगेडिया

नगर – पुणे येथे आयोजित गाईडेड बोन रिजनरेशन व अस्थेटिक मॅनेजमेंट‘ ऑफ इम्प्लांट्स इन इंटेरियर केसेस, या प्रगत प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे अहिल्यानगर येथील डॉ. स्वाती चंगेडिया यांनी यशस्वीरीत्या पूर्णत्व केले. हा अभ्यासक्रम मुंबईतील इम्प्लांटोलॉजिस्ट डॉ. रत्नदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. या प्रशिक्षणामध्ये जबड्याच्या हाडाची पुनर्निर्मिती गाईडेड बोन रजिस्ट्रेशन तसेच समोरील दातांच्या इम्प्लांटचे नैसर्गिक व आकर्षक सौंदर्य जपत उपचार करण्याच्या आधुनिक तंत्रांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी डॉ. स्वाती चंगेडिया यांनी सांगितले की, हरवलेल्या दातांच्या जागी डेंटल इम्प्लांट हा सर्वात प्रभावी व कायमस्वरूपी उपचार पर्याय आहे. इम्प्लांट कृत्रिम दाताच्या मुळाप्रमाणे कार्य करत असल्याने जबड्याचे हाड सुरक्षित राहते, चावण्याची क्षमता पूर्ववत होते तसेच शेजारील दात हलण्यापासून संरक्षण मिळते. योग्य निगा राखल्यास डेंटल इम्प्लांट अनेक वर्षे टिकणारा, सुरक्षित आणि नैसर्गिक वाटणारा उपचार आहे. त्यांनी पुढे सांगितले की, गाईडेड बोन रीजनरेशन ही आधुनिक शस्त्रक्रिया पद्धत असून जबड्याचे कमी झालेले किंवा झिजलेले हाड पुन्हा तयार करण्यासाठी वापरली जाते. बोन ग्राफ्ट व विशेष बॅरिअर मेम्ब्रेनच्या साहाय्याने शरीरातील नैसर्गिक हाड तयार होण्याच्या प्रक्रियेला चालना दिली जाते. त्यामुळे डेंटल इम्प्लांटसाठी मजबूत व टिकाऊ पाया तयार होतो आणि उपचाराचे यश अधिक वाढते.

## ‘दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन’ची घर दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी ‘हाऊसफिन कर्ज योजना’ सुरु

नगर – घर दुरुस्ती, सुशोभीकरण किंवा नूतनीकरण करू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी गृहनिर्मिती क्षेत्रातील राज्यस्तरीय संस्था असलेल्या दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबईच्या वतीने हाऊसफिन ही विशेष कर्ज योजना सुरू केली आहे. संस्थेने हाऊसफिन दुरुस्ती / नूतनीकरण कर्ज योजना या नावाने ही योजना अंमलात आणली असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील गरजू नागरिकांनी आणि सभासदांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

अनेकदा जुन्या घराची दुरुस्ती करणे, छताचे काम करणे, अंतर्गत बदल किंवा नूतनीकरण करण्यासाठी एकदम मोठ्या रकमेची गरज भासते. अशा वेळी नागरिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. नागरिकांची हीच अडचण दूर करण्यासाठी आणि त्यांना सुलभ दरात आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी या राज्यस्तरीय संस्थेने पुढाकार घेतला आहे. या योजनेअंतर्गत घर दुरुस्ती व नूतनीकरणासाठी कर्ज पुरवठा केला जाणार आहे. माहितीसाठी ४/१, शिल्पा अपार्टमेंट्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, माणिकनगर, नगर–पुणे रोड, अहिल्यानगर येथील संस्थेच्या कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन प्रभारी जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## एमआयडीसीतील कंपनीतून चोरी

नगर – येथील एमआयडीसी परिसरामध्ये असलेल्या मॅट्रिक्स इंजिनिअरिंग टेक्निक्स कंपनीतून दोन महत्त्वाचे जॉब पार्ट व इतर साहित्य चोरीला गेल्याची घटना २१ जूनच्या रात्री साडेआठ वाजेपासून ते २२ जूनच्या सकाळी साडेआठ वाजे दरम्यानच्या काळात घडली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात २९ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तुषार अशोक सोनवणे (रा.कसबे वस्ती, तपोवन रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. एमआयडीसी भागातील ब्लॉक नंबर एफ–०४/१ मध्ये असलेल्या मॅट्रिक्स इंजिनिअरिंग टेक्निक्स कंपनीत अज्ञात चोरट्याने २० हजार आठशे रुपये किमतीचे दोन महत्त्वाचे जॉब पार्ट आणि तीन हजार रुपये किमतीच्या दोन प्रवासी पिशव्या असा एकूण २३ हजार ८०० रुपये किमतीचा हा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## शहरातील अस्ताव्यस्त वाहनांवर वाहतूक शाखेची कारवाई



नगर – शहरातील आडते बाजार परिसरात वाहतूक शाखेने ‘नो पार्किंग’मध्ये अस्ताव्यस्त पद्धतीने उभ्या असलेल्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला. रस्त्यावरच अनधिकृतपणे आणि नो पार्किंग झोनमध्ये वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वाहतूक शाखेच्या पथकाने तब्बल २० वाहनांवर मोटार वाहन कायदा कलम १२२ अन्वये कारवाई केली आहे.

आडते बाजार हा परिसरातील मुख्य व्यापारी मार्ग असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणावर मालाची वाहतूक करणारी मोठी वाहने (ट्रक, टेम्पो) येत असतात. मात्र, काही वाहनचालक नो पार्किंग झोनमध्ये व रस्त्यावरच अस्ताव्यस्त वाहने उभी करतात. आधीच मोठी वाहने आणि त्यात रस्ता छोटा अशी अवस्था असल्यामुळे रस्त्यावर वेडीवाकडी वाहने उभी केल्यास संपूर्ण रस्ता ‘जाम’ होऊन वाहतुकीचा मोठा खोळंबा होत होता. याचा फटका स्थानिक व्यापारी, पादचारी आणि खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना बसतो. व्यापाऱ्यांनीही आपल्याकडे आलेली वाहने वाहतुकीला अडथळा ठरत नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. तशा सुचनाही अनेक व्यापाऱ्यांना देण्यात आल्या. २९ मे रोजी दुपारी २ ते ३ वाजेदरम्यान पोलीस उपनिरीक्षक अण्णा परदेशी, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब शिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक श्यामूवेल गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील पोकॉ. सचिन पवार, सतीश दळवी, प्रवीण खंडागळे आणि विजय राठोड यांच्या पथकाने या बेशिस्त वाहनांवर कारवाईला सुरुवात केली. यावेळी रस्त्यावर वाहतुकीला थेट अडथळा ठरतील अशा पद्धतीने लावलेली वाहने शोधून काढण्यात आली. यावेळी २० वाहनांवर मोटार वाहन कायद्याच्या कलम १२२ नुसार कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या अचानक झालेल्या कारवाईमुळे आडते बाजारातील रस्ता मोकळा होवून वाहतूक पूर्ववत होण्यास मदत झाली.

## महिलेच्या गळ्यातील सोन्याच्या चेनची चोरी

नगर – शहरातील चांदणी चौक परिसरातील डी.ए.डी. कॉलनीमध्ये अज्ञात चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गुंजन ओमप्रकाश तिवारी (वय ३६, रा. लखनऊ, उत्तरप्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या कामानिमित्त अहिल्यानगर येथे आल्या होत्या. २८ जूनच्या सकाळी ६ ते २९ जूनच्या दुपारी १२ वाजेच्या दरम्यान त्या चांदणी चौक परिसरातील कॉलनीमध्ये होत्या. याच दरम्यान एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ८ ग्रॅम वजनाची ५० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन लांबवली.

चोरीची ही घटना समजताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी तातडीने पथकासह घटनास्थळाला भेट दिली. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## लॉनच्या पार्किंगमधून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील मनमाड रोडवर असलेल्या संजोग लॉनच्या पार्किंगमधून एक मोपेड (क्र. एमएच १६ डीके ७१२३)अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २८ जून रोजी सकाळी ११.४५ ते दुपारी १२.३० च्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी रिटा रामनाथ मल्होत्रा (रा. सिंधी कॉलनी, तारकपूर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## तांब्याची तार आणि ऑईलची चोरी

नगर – भिंगार जवळील जामखेड रस्त्यावरील एका भागात असलेल्या विजेच्या ट्रान्सफॉर्मरमधून अज्ञात चोरट्याने तांब्याची तार आणि ऑईल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात महेश जालिंदर गुंजाळ (वय ३६, रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जामखेड रस्त्यावरील राजेंद्र सिंग इन्क्लीव परिसरात असलेल्या १६० केव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरमधून १ लाख २० हजार रुपये किमतीची १२० किलो तांब्याची तार आणि १९ हजार रुपये किमतीचे २१० लिटर ट्रान्सफॉर्मर ऑईल असा एकूण १ लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. ही घटना २९ जून रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेनंतर महेश गुंजाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आर. एस. मिसाळ करत आहेत.

# सागर बेग यांचे घर बॉम्बने उडवून देण्याची धमकी; पोलिस संरक्षण द्यावे

### विविध संघटनांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – श्रीरामपूर येथील हिंदू समाजाचे कार्यकर्ते सागर बेग आणि त्यांचे बंधू शिवसेना नगरसेवक आकाश बेग यांचे घर बॉम्बने उडवून देण्याची धमकी पाकिस्तानातील गुन्हेगारी टोळीने दिली आहे. त्यामुळे बेग यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याने शासनाने त्यांना तातडीने सशस्त्र पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी सकल हिंदू समाज, वाल्मिकी समाज आणि राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, पुणे येथील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी अस्लम उर्फ बंटी जहागीरदार याच्या हत्या प्रकरणामध्ये सागर अशोक बेग व त्यांच्या बंधूंचे नाव विनाकारण जोडण्यात आले होते. मात्र, पोलिसांच्या सखोल तपासामध्ये या प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. असे असतानाही, काही समाजकंटक, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती आणि अतिरेकी विचारसरणीच्या घटकांकडून सोशल मीडियावर सूडबुद्धीने सागर बेग



सागर बेग यांना सशस्त्र पोलीस संरक्षण मिळावे, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देताना सकल हिंदू समाज, वाल्मिकी समाज, राष्ट्रीय श्रीराम संघाचे पदाधिकारी.

व त्यांच्या कुटुंबाविरोधात सातत्याने आक्षेपार्ह संदेश प्रसारित केले जात असून त्यांचे घर बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली जात आहे. २३ मे रोजी विनानोंदणी क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन व्यक्तींनी सागर बेग यांच्या निवासस्थानाचे संशयास्पद रितीने छायाचित्रण व रेकी केली. या घटनेच्या अवघ्या दोनच दिवसांत पाकिस्तानस्थित कथित गुन्हेगार राणा हुनेन, सैजाद भट्टी आणि अभीद जाट यांनी सागर बेग यांचे निवासस्थान बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली.

याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, अद्याप या प्रकरणात कारवाई झालेली नाही. काही असामाजिक आणि राष्ट्रविरोधी प्रवृत्तींकडून त्यांच्याविरुद्ध द्वेषभावना निर्माण करून त्यांच्या जीवितास धोका निर्माण केला जात आहे. दुसरीकडे, त्यांचे बंधू शिवसेना नगरसेवक आकाश बेग यांनाही अश्या धमक्या मिळत असल्याने दोन्ही बंधूंच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर शरद घोरपडे, आकाश वैरागर, भारत गाढे, आकाश टाक, जितेंद्र चव्हाण, सचिन वाळके, रोहन चव्हाण, अमित चव्हाण आदींची नावे आहेत. याप्रसंगी सकल हिंदू समाज, वाल्मिकी समाज, राष्ट्रीय श्रीराम संघ आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# खांबांवर लटकवलेले अनधिकृत फ्लेक्स बोर्ड हटविले







नगर – शहरातील सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्त्याच्या कडेला असलेल्या विजेच्या आणि पथदिव्यांच्या खांबांवर अनधिकृतपणे लावण्यात आलेले तब्बल ४० पेक्षा जास्त जाहिरातींचे फ्लेक्स बोर्ड महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने काढून घेत ते जप्त केले. ही कारवाई २९ जून रोजी दुपारनंतर करण्यात आली.

सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड हा अत्यंत गजबजलेला आणि महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावरून नागरिकांची व वाहनांची सतत मोठी वर्दळ असते. याचाच फायदा उठवत विविध व्यावसायिक आणि जाहिरातदारांनी महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, रस्त्याच्या कडेला असलेल्या विजेच्या आणि पथदिव्यांच्या खांबांवर अनधिकृतपणे मोठमोठे फ्लेक्स बोर्ड लावले होते. यामुळे संपूर्ण परिसराचे विद्रुपीकरण होत होते, तसेच वाहनधारकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताची भीतीही निर्माण झाली होती.

या वाढत्या फ्लेक्स बोर्ड आणि शहर विद्रुपीकरणाबाबत जागरूक नागरिकांनी महापालिकेकडे तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत महापालिकेचे प्रभारी विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. २९ जून रोजी दुपारच्या सत्रात अतिक्रमण विभागाचे पथक सर्व साधनांसह पाईपलाईन रोडवर दाखल झाले. प्रभारी विभाग प्रमुख आदित्या बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ही मोहिम राबवली. विजेचे खांब आणि पथदिव्यांचे खांबावर ठिकठिकाणी लटकविण्यात आलेले तब्बल ४० पेक्षा जास्त अनधिकृत फ्लेक्स बोर्ड या पथकाने हटविले आणि ते जप्त करून महापालिकेच्या वाहनात जमा केले. शहराचे सौंदर्य बिघडवणाऱ्या कोणत्याही अनधिकृत जाहिराती व फ्लेक्स खपवून घेतले जाणार नाहीत. परवानगी न घेता सार्वजनिक मालमत्ता, खांब किंवा रस्त्याकडेला फ्लेक्स लावल्यास यापुढे कडक कारवाई करण्याचा इशारा महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने दिला आहे.

## ‘लाईफस्टाईल वेलनेस सेंटर’चा प्रोफेसर कॉलनी चौक येथे शुभारंभ



प्रोफेसर कॉलनी चौक येथे ‘लाईफस्टाईल वेलनेस सेंटर’चा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – प्रोफेसर कॉलनी चौक येथे ‘लाईफस्टाईल वेलनेस सेंटर’चा शुभारंभ आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले, वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार डॉ.तुकाराम नेहरकर, वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार अंबादास इंगळे यांच्या हस्ते झाला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर भगवान फुलसौंदर, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक रेवन्नाथ पवार, सुनील भोसले (GST deputy Commisioner), डॉ. वनीता पाटील (कोल्हापूर), जालिंदर कोतकर, राष्ट्रवादी काँग्रेस शहर युवक जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर, माणिकराव विधाते, दगडूमामा पवार, माजी नगरसेवक सुनील कोतकर, नम्रता कोतकर, मंजुषा शेलार, संजय शेलार, कल्याणी ठुबे, भरत ठुबे, साक्षी ताठे, अनिकेत ताठे, आरती ठुबे, किशोर ठुबे, तेजस्विनी कोतकर, अनिल कोतकर, प्रांजली खटके, विजय खटके, शुभम शेलार आदीं उपस्थित होते.

यावेळी जागतिक आरोग्य सल्लागार रेखा नेहरकर, डॉ. तुकाराम नेहरकर आणि अंबादास इंगळे यांनी संतुलित जीवनशैली, योग्य आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि आधुनिक जीवनातील आरोग्यविषयक आव्हानांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर करा

### अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने दिले शिक्षण संचालनालयाला निवेदन; साडेसहा लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित

पुणे – राज्यातील इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या प्रक्रियेला दोन महिने उलटूनही राज्यातील तब्बल साडेसहा लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान तात्काळ थांबवावे, या मागणीसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) पश्चिम महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महेश पालकर यांना निवेदन सादर करण्यात आले.

अभाविपने निवेदनात नमूद केले, राज्यस्तरीय केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे हे दुसरे वर्ष असूनही विद्यार्थ्यांना आजही अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा उद्देश पारदर्शकता, समान संधी आणि गुणवत्तेनुसार प्रवेश देणे हा असताना प्रत्यक्षात वेबसाईट वारंवार बंद पडणे, ओटीपी न मिळणे, ऑनलाइन शुल्क भरताना व्यवहार अडकणे, कागदपत्रे अपलोड न होणे अशा तांत्रिक अडचणींमुळे हजारो विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून अनेक विद्यार्थ्यांना अर्ज पूर्ण करण्यासही अडथळे निर्माण होत आहेत. या सर्व तांत्रिक त्रुटी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी सक्षम सर्व्हर व्यवस्था आणि प्रभावी तांत्रिक यंत्रणा उभारण्याची मागणी अभाविपने केली आहे.

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यामागील प्रमुख उद्देश खासगी क्लासेस व काही महाविद्यालयांमधील अनधिकृत भागीदारी रोखणे आणि गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणे हा होता. मात्र काही ठिकाणी या प्रक्रियेलाच हरताळ फासण्याचे प्रकार सुरू असून, टायअप असलेले तसेच नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांमधील तुकड्यांची संख्या वाढवून प्रवेश प्रक्रियेत पळवाटा काढल्या जात असल्याचे अभाविपने निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पहिल्याच फेरीपासून अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांतील आरक्षित व खुल्या प्रवर्गातील जास्तीत जास्त जागा भरल्या जातील, अशी सुधारित कार्यपद्धती अवलंबावी, अशी मागणी करण्यात आली.



राज्यातील इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी दूर करण्याचे निवेदन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) पश्चिम महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महेश पालकर यांना देण्यात आले.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी व पालकांना अद्यापही संपूर्ण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे शासनाने शाळास्तरावरच विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. विद्यार्थी दहावीमध्ये शिकत असतानाच त्यांना पुढील प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन मिळेल, अशी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी मागणी अभाविपने केली. याचबरोबर राज्यातील आश्रमशाळांनाही या केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात यावे, जेणेकरून राज्यातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध होईल, अशी भूमिका मांडण्यात आली.

राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आकारल्या जाणाऱ्या शुल्कामध्ये मोठी तफावत असल्याचेही अभाविपने निदर्शनास आणले. भौगोलिक व शासनाच्या निकषांनुसार शुल्क निश्चित करून कोणत्याही महाविद्यालयाने नियमबाह्य अथवा छुपे शुल्क आकारू नये, यासाठी कठोर नियंत्रण यंत्रणा उभारावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

### १० जुलैपासून वर्ग सुरू करण्याची मागणी

यावर्षी दहावीचा निकाल वेळेपूर्वी लागूनही अकरावी प्रवेश प्रक्रियेला तब्बल दोन महिन्यांचा विलंब झाला आहे. राज्यात १४ लाखांहून अधिक अर्जांपैकी केवळ साडेसात लाख विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळाला असून उर्वरित साडेसहा लाख विद्यार्थी अद्याप वंचित आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ज्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत, त्यांचे वर्ग १० जुलैपासून सुरू करण्याचे आदेश जारी करावेत आणि पुढील वर्षापासून १ जुलैपासूनच अकरावीचे वर्ग नियमित सुरू होतील, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी अभाविपने केली आहे. शासनाने या सर्व मागण्यांची गंभीर दखल घेऊन प्रवेश प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व विद्यार्थी हितैषी करावी, असा इशारा संघटनेने दिला आहे.

### सुमारे ७.५ लाख अतिरिक्त जागा कोणासाठी?

अभाविपचे प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी शिक्षण विभागाच्या कारभारावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले, राज्यात एकूण ९ हजार ६६९ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये २२ लाख १४ हजार ४०६ एवढ्या एकूण जागा उपलब्ध आहेत. या जागांच्या तुलनेत १४ लाख ३७ हजार ६५६ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले आहेत. म्हणजेच राज्यात तब्बल साडेसात लाख अतिरिक्त जागा आहेत. असे असतानाही केवळ ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक त्रुटी, विलंब आणि व्यवस्थापनातील उणिवांमुळे अद्यापही ५० टक्के विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. मग गरज नसताना एवढ्या जागा महाविद्यालयांना वाढवून देण्याचे कारण काय? खासगी क्लासेस आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील अनधिकृत भागीदारी जिवंत ठेवण्यासाठी शासनातीलच काही अधिकारी छुप्या पद्धतीने मदत करत आहेत का? याचा शोध घेणे गरजेचे आहे. शासनाने अभाविपच्या सर्व मागण्या मान्य करीत तातडीने या सर्व त्रुटी दूर करून प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थी हिताची करावी, असे कुलकर्णी म्हणाले.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी सौ. अर्चना प्रविण तांबे, मी दहा महिन्यांपासून नियमित योगाला येत आहे. मला सायटीकाचा आजार आहे. मला खूप औषधे घेऊन सुध्दा त्रास होत होता. मी जेव्हापासून योगाला येते तेव्हापासून माझा खूप त्रास कमी झाला आहे.

मला योगाला येण्याआधी खूप कंटाळा, चिडचिड, थकवा असायचा पण जेव्हापासून मी योगा करते तेव्हापासून मला खूप फ्रेश वाटते. मी दिवसभर काम केले तरी मला खूप फ्रेश वाटते. निरोगी आयुष्य कसे जगावे हे आपल्याला योग शिकवते आणि ते मी अनुभवले आहे.

दरवर्षी २१ जून हा दिवस ’आंतरराष्ट्रीय योग दिवस’ म्हणून साजरा करतात. आपल्या जीनवात योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. नियमित योगा केल्यास ताण–तणावापासून आपल्याला मुक्ती मिळू शकते. सकाळी उठून प्राणायाम केल्याने आपल्याला पूर्ण दिवस उत्साह राहतो. योगा केल्याने वजन नियंत्रणात राहते. योग आपल्याला शिस्त लावते.

तसेच प्रत्येकामध्ये सकारात्मक दृष्टीकोन येतो. योगामुळे आपण मोठमोठ्या आजारांवर मात करु शकतो. योगामुळे पचनशक्ती सुधारते. मन आनंदी राहते. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते आणि स्नायू मजबूत होतात. ह्रदयाचे आरोग्य चांगले राहते. योगामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढते. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योगासन होय. योगा म्हणजे मानवजातीसाठी एक उत्तम देणगी आहे. ती आपल्याला निरोगी राहण्यास मदत करते.

आमचे योग गुरु अनिल मेहेर सर आम्हाला योगा शिकवण्यासाठी खूप मेहनत घेतात. आमच्या आजारांविषयी जाणून घेऊन त्या पध्दतीने योग घेतात. त्याचा फायदा आम्हाला सर्व योग टीमला होतो. आमच्या योगा टीममध्ये सर्व जण तरुण असल्याची जाणीव आम्हाला योगा केल्यामुळे होते. त्यामुळे आम्हाला योगा करणे खूप आवडते. योग ही एक जादू आहे. निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली म्हणजे योग.



– **अर्चना तांबे,** अहिल्यानगर

